RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -४ था ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि.१८ जानेवारी २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## राम मंदिरातील प्राणप्रतिष्ठापनेनिमित्त २२ जानेवारी रोजी अर्धा दिवस सुट्टी, केंद्र सरकारकडून घोषणा

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

२२ जानेवारी रोजी अयोध्येतील राम मंदिरामध्ये होणाऱ्या प्राणप्रतिष्ठापना सोहळ्याबाबत देशभरात उत्सुकतेचं वातावरण आहे. प्रत्यक्ष अयोध्येमध्ये राम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्ट, राज्य सरकार आणि केंद्र सरकारकडून जय्यत तयारी केली जात आहे. दरम्यान, या प्राणप्रतिष्ठापना सोहळ्यानिमित्त संपूर्ण देशभरात अर्धा दिवस सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. २२ जानेवारी रोजी देशभरातील केंद्रीय कर्मचाऱ्यांना अर्धा दिवस सुटी देण्याचे आदेश केंद्र सरकारकडून प्रसिद्ध करण्यात आले आहेत.




केंद्र सरकारकडून यासंदर्भात प्रसिद्ध करण्यात आलेल्या पत्रामध्ये म्हटलंय की, कर्मचाऱ्यांकडून व्यक्त होत असलेली भावना आणि त्यांच्याकडून करण्यात येत असलेली विनंती विचारात घेऊन सरकारने या दिवशी अर्धा दिवस सुट्टी देण्याची घोषणा केली आहे. या दिवशी शाळा महाविद्यालयेही अर्धा दिवसच सुरू राहतील. राम मंदिरातील प्राणप्रतिष्ठापनेनिमित्त संपूर्ण देशभरात सर्व केंद्रीय सरकारी कार्यालये, केंद्रीय संस्था आणि केंद्रीय औद्योगिक प्रतिष्ठानांमध्ये २२ जानेवारी रोजी दुपारी अर्धा दिवस सुट्टी असेल. राम मंदिरात होणाऱ्या प्राणप्रतिष्ठापना सोहळ्याचं थेट प्रक्षेपण पाहता यावं यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

दरम्यान, राम मंदिरामध्ये होणाऱ्या उद्घाटन सोहळ्याच्या तयारीबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व मंत्र्यांकडून माहिती घेतली आहे. तसेच या दिवशी दिवाळीसारखा उत्सव साजरा झाला पाहिजे, असं आवाहनही करण्यात आलं आहे. २२ जानेवारी रोजी घरोघरी पणत्या लावण्याचे आणि गरिबांना भोजन देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच २२ जानेवारीनंतर आपापल्या लोकसभा मतदारसंघातील भाविकांना ट्रेनच्या माध्यमातून अयोध्येला पाठवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

## २५०० वर्षांची 'गॅरंटी'! भूकंप येवो अथवा त्सुनामी, राम मंदिराची एक वीट हलणार नाही

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक अयोध्या**

२२ तारखेला राम मंदिरात रामलला प्राणप्रतिष्ठा सोहळा होत आहे. यापूर्वी अनेकविध धार्मिक विधींना सुरुवात झाली आहे. विशेष अनुष्ठान, पूजा-पाठ सुरू आहेत. राम मंदिरावरून राजकारणही तापताना दिसत आहे. यातच एखादा मोठा भुकंप आला किंवा त्सुनामी आली तरीही राम मंदिराला कोणताही धोका पोहोचणार नाही, अशाच प्रकारे या मंदिराची रचना आणि बांधकाम केले आहे, अशी माहिती देण्यात आली आहे.

अहमदाबाद-बीआरडीचे आर्किटेक्ट चंद्रकांत यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते १,२०० कोटी रुपयांच्या राम मंदिराचे उद्घाटन करण्यात येणार आहे. हिमालय क्षेत्रात येणाऱ्या पूर आणि भूकंपाचा अभ्यास करून भुकंप प्रतिरोधक यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे. हे राम मंदिर २५०० वर्षे सुरक्षित राहील, असा दावा करण्यात आला आहे. सोमपुरा आणि त्यांचा मुलगा आशिष यांनी मंदिर परिसराची संरचना केली.

### राम मंदिर सर्वधर्मियांसाठी खुले असावे

चंद्रकांत यांनी सांगितले की, प्रकृतीच्या कारणास्तव प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला जाण्यास जमणार नाही. परंतु मंदिर पूर्ण झाल्यावर ते सर्व धर्माच्या लोकांसाठी खुले व्हावे, अशी इच्छा चंद्रकांत यांनी व्यक्त केली. चंद्रकांत यांनी देश-विदेशातील २०० हून अधिक मंदिरांची संरचना केली आहे. हे जगातील पहिले मंदिर असेल ज्यासाठी रिश्टर स्केलवर ८ पर्यंतच्या भूकंप प्रतिरोधासाठी बांधकाम करण्यापूर्वी ३ऊ संरचनात्मक विश्लेषण केले गेले आहे. रुरकी येथील सेंट्रल बिल्डिंग रिसर्च इन्स्टिट्यूटने राम मंदिराला कोणताही धोका पोहोचू नये, यासाठी सखोल आणि सविस्तर पाहणी, विश्लेषण केले. हे राम मंदिर आतापर्यंत नोंदवल्या गेलेल्या सर्वोच्च पूर पातळीपेक्षा २० फूट अधिक उंचावर आहे, अशी माहिती आशिष यांनी इंडियन एक्स्प्रेसला दिली.

## दिवाळीपेक्षा अधिक फटाके देशात वाजणार प्राणप्रतिष्ठेसाठी ४०० कोटींचा बाजार सज्ज

**दि. १८ विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

येत्या २२ जानेवारी रोजी अयोध्येतील राम मंदिरात होत असलेल्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी दिवाळीपेक्षाही अधिक फटाके विकले जात आहेत. देशभरात जवळपास ४०० कोटी रुपयांचा फटाका बाजार त्यासाठी सजला आहे. तामिळनाडूतील शिवकाशी येथील प्रसिद्ध फटाके उत्पादकांची संघटना 'शिवकाशी फायर वर्क्स मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन'च्या माहितीनुसार, एकट्या अयोध्येत २५० कोटी रुपयांचा फटाके बाजार तयार आहे.'ऑल इंडिया फायर वर्क्स ट्रेडर्स असोसिएशन'ने म्हटले की, या सोहळ्यासाठी उभा राहिलेला फटाक्यांचा



बाजार दिवाळीपेक्षा कोणत्याही बाबतीत कमी नाही. 'इंडियन फायर वर्क्स'चे सचिव अनुप जायस्वाल यांनी सांगितले की, उत्तर भारतासह पश्चिम बंगालमधील फटाका उत्पादकांचे १०० ते १५० कोटी रुपयांचे फटाके विकले जातील.

### उत्पादकांमध्ये चैतन्य

'एसएफएमए'चे पदाधिकारी संजय मुरुगन यांनी सांगितले की, फटाक्यावरील प्रतिबंधामुळे दिवाळीचा फटाका बाजार थंड राहिला आहे.

एकेकाळी एकट्या दिवाळीत ७०० ते ९०० कोटी रुपयांचे फटाके विकले जात असत. राम मंदिराच्या उद्घाटन सोहळ्यामुळे फटाका बाजारात पुन्हा एकदा उत्साह निर्माण झाला आहे.

उत्पादकांना २०० ते २५० कोटी रुपयांची, तर देशाच्या इतर भागांतील निर्मात्यांना आणखी १५० कोटी रुपयांची मिळकत होईल, असा अंदाज आहे.

## भारतीय जनता पक्षाकडून निवडणुकीतील फायद्यासाठी राम मंदिर उद्घाटनाचा इव्हेंट : रमेश चेन्नीथला

### काँग्रेस पक्ष सोडून कोणी जाणार नाही, भाजपाकडून अफवा पसरवून दिशाभूल करण्याचा प्रयत्न

**दि.१८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

भारतीय जनता पक्षाकडून अयोध्येतील राम मंदिर उद्घाटनाचे भांडवल केवळ राजकीय फायदा उठवण्यासाठी केले जात आहे. मंदीर अजून अर्धवट असून अर्धवट मंदिरात प्राणप्रतिष्ठा करणे अयोग्य आहे हे शंकराचार्यांनी जाहीरपणे सांगितले आहे परंतु भाजपाला घाई झाली असून निवडणुकीतील फायद्यासाठी राम मंदिर उद्घाटनाचा इव्हेंट केला जात आहे, असा आरोप प्रदेश प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी केला आहे.लोकसभा निवडणुकीच्या तयारीसाठी प्रदेश काँग्रेसच्या आढावा बैठकीची सुरुवात अमरावतीतून झाली. यावेळी रमेश चेन्नीथला




प्रसार माध्यमांशी संवाद साधत होते, ते पुढे म्हणाले की, काँग्रेस पक्ष राम मंदिराच्या विरोधात नाही, सर्वांना आपले धार्मिक स्वातंत्र्य आहे. काँग्रेस पक्षातील अनेक नेतेही अयोध्येला जाऊन आले आहेत. मकर संक्रांतीच्या दिवशी काँग्रेस नेते व उत्तर प्रदेशचे प्रभारी अविनाश पांडे यांनी सहकाऱ्यांसह अयोध्येला भेट देऊन रामलल्लाचे दर्शन घेतले. अयोध्येला ज्यांना जायचे आहे त्याला विरोध केलेला नाही. भारतीय जनता पक्ष व नरेंद्र मोदी हे राजकीय फायद्यासाठी मंदिर उद्घाटनाचा इव्हेंट करत आहेत ते चुकीचे आहे आणि जनतेला ते माहीत आहे.

भारत जोडो न्याय यात्रेविषयी बोलताना रमेश चेन्नीथला म्हणाले की, राहुल गांधी यांनी मणिपूर ते मुंबई भारत जोडो न्याय यात्रा सुरु केली असून या न्याय यात्रेला मोठे जनसमर्थन मिळत आहे. भारत जोडो न्याय यात्रा ही निवडणूक यात्रा नाही तर देशातील सर्वसामान्य जनतेला न्याय देण्यासाठी आहे. यात्रेच्या माध्यमातून राहुल गांधी भारत जोडण्याचे काम करत आहेत, ही यात्रा देशासाठी आहे.

पत्रकारांच्या एका प्रश्नाला उत्तर देताना रमेश चेन्नीथला म्हणाले की, महाराष्ट्र काँग्रेस सक्षम असून सर्व नेते एकत्र आहेत कोणाही पक्ष सोडून जाणार नाही. भारतीय जनता पक्ष अफवा पसरवून दिशाभूल करत आहे. माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे व प्रदेश कार्याध्यक्ष आ. प्रणिती शिंदे यांनी त्यांची भूमिका स्पष्ट केलेली आहे.विभागीय बैठकीमध्ये संघटनात्मक तयारीचा आढावा घेण्यात आला. प्रदेश काँग्रेस कमिटीने दोन महिन्यापूर्वी जिल्हा काँग्रेस कमिट्यांना कार्यक्रम दिला होता त्याचा आढावाही घेतला जात आहे. आज अमरातीमध्ये बैठक झाली असून शेवटची बैठक मराठवाडा विभागात २९ तारखेला लातूरमध्ये होत आहे.

प्रदेश काँग्रेस कमिटीचे नवनियुक्त प्रभारी रमेश चेनीथल्ला यांच्या प्रमुख उपस्थितीत व प्रदेश काँग्रेस अध्यक्ष नाना पटोले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात, माजी मुख्यमंत्री व काँग्रेस कार्यसमितीचे सदस्य अशोक चव्हाण, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, चंद्रकांत हंडोरे, माजी मंत्री यशोमती ठाकूर, अनिस अहमद, महिला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष संध्या सव्वालाखे, -खउउ सचिव व सहप्रभारी आशिष दुआ, अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष आ. वजाहत मिर्जा, प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे, प्रदेश उपाध्यक्ष नाना गावंडे, सुनिल देशमुख यांच्यासह अमरावती विभागातील सर्व जिल्हाध्यक्ष, प्रमुख नेते व पदाधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

## भाजप तर्फे दिपोत्सवाची जय्यत तयारी

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

श्रीराम जन्मभूमी अयोध्या येथे आयोजित भव्य प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर भाजपा अमरावती शहरतर्फे शहराध्यक्ष आमदार प्रवीण पोटे यांच्या नेतृत्वाखाली दीपोत्सव व आनंदोत्सव साजरा करण्यात येत आहे. यानुषंगाने स्थानिक कठोरा नाका येथे गाडगेबाबा भाजपा मंडाळाची बैठक नुकतीच झाली.

२२ जानेवारी २०२४ रोजी श्रीरामाच्या प्राणप्रतिष्ठेचं अद्वितीय सौंदर्य, अयोध्येत होणाऱ्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या निमित्ताने अमरावती शहर भाजपातर्फे विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजनाचीमाहिती यावेळी उपस्थितांना देण्यात आली. २२ जानेवारीला घरोघरी भजन, कीर्तन, दीपोत्सव त्याचप्रमाणे घरोघरी दिवे लावून दिवाळी उत्सव साजरा करण्याचे आवाहन आमदार प्रवीण पोटे पाटील यांनी केले. शहर भाजपद्वारा शहरातील मंदिरामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजनकरण्यात आले असून महाआरती व लाडू प्रसादाचे वाटप करण्यात येणार असल्याचे आमदार प्रवीण पोटे पाटील यांनी सांगितले. या बैठकीला जयंत डेहनकर, किरण पातुरकर, दिनेश सूर्यवंशी, रवींद्र खांडेकर, प्रशांत शेगोकार, चेतन पवार, सतीश करेसिया, विवेक कलोती, किरणताई महल्ले,सह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## बेहिशोबी मालमत्ता, आ. राजन साळवी यांच्यावर गुन्हा दाखल; पत्नी, मुलाचाही समावेश

**दि.१८ विदर्भ प्रजासत्ताक रत्नागिरी**

तब्बल साडेतीन कोटी रुपयांची बेहिशोबी मालमत्ता जमा केल्याच्या आरोपावरुन उद्धव ठाकरे शिवसेनेचे राजापूरचे आमदार राजन साळवी, तसेच त्यांची पत्नी अनुजा आणि मुलगा शुभम या तिघांविरुद्ध गुरुवारी सकाळी रत्नागिरी शहर पोलिस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लाचलुचपत प्रतिबंध विभागाकडून ही कारवाई करण्यात आली असून, या विभागाचे उपअधीक्षक सुशांत चव्हाण अधिक तपास करत आहेत.

जवळपास सव्वा वर्षाहून अधिक काळ आमदार साळवी यांची चौकशी अलिबाग लाचलुचपत प्रतिबंध विभागाकडून सुरू आहे. यात त्यांची पत्नी अनुजा, मुलगा शुभम, त्यांचे भाऊ दीपक तसेच पुतण्या अथर्व याचीही चौकशी लाचलुचपत विभागाकडून करण्यात आली आहे.

चालू महिन्यातच सर्वांचे जबाब नोंदवण्याचे काम संपले आहे. आमदार साळवी तसेच त्यांच्या जवळच्या नातेवाईकांच्या नावे असलेल्या मालमत्तेची कागदपत्रे तपासण्यात आली. त्यानंतर आता गुरुवार १८ रोजी सकाळी ९:०८ वाजता आमदार राजन साळवी, पत्नी अनुजा आणि मुलगा शुभम यांच्याविरुद्ध रत्नागिरी शहर पोलिस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आमदार राजन प्रभाकर साळवी, अनुजा साळवी, शुभम साळवी (सर्व रा. साहेब बंगला, एमएसईबी ऑफिसच्या बाजूला,



खालची आळी, रत्नागिरी) यांच्याकडे रत्नागिरी शहर हद्दीत व रत्नागिरी जिल्ह्यामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी ऑक्टोबर २००९ ते ०२ डिसेंबर २०२२ या कालावधीमध्ये असलेले ज्ञात उत्पन्न, खर्च व मालमत्ता विचारात घेण्यात येऊन, त्यांच्या ताब्यात ज्ञात उत्पन्नापेक्षा जास्त एकूण ३,५३,८९,७५२/- रुपये इतकी अपसंपदा म्हणजेच ११८.९६ % अपसंपदा संपदित केली असल्याचे स्पष्ट झाले आहे व त्याबाबतचा समाधानकारक खुलासा त्यांनी सादर केला नाही.

त्यामुळे आमदार साळवी यांनी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ (संशोधन २०१८) चे कलम १३(१)(ब) सह १३(२) प्रमाणे तसेच त्यांची पत्नी अनुजा व मुलगा शुभम यांनी नमूद मालमत्ता ही अपसंपदा आहे हे माहित असूनही जाणीवपूर्वक ती स्वतःच्या नावे धारण करून कब्जात बाळगणे कामी राजन साळवी यांना गुन्हा करण्यास प्रोत्साहन दिले. म्हणून रत्नागिरी शहर पोलिस ठाणे गुन्हा रजि नंबर २४/२०२४ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ (संशोधन २०१८) चे कलम १२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे, असे या प्रकरणातील फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणाची सर्व कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे परिक्षेत्राचे पोलिस अधीक्षक सुनील लोखंडे, अतिरिक्त पोलिस अधीक्षक अनिल येरडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली रत्नागिरीचे उपअधीक्षक सुशांत चव्हाण करत आहेत.गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर आमदार राजन साळवी यांचे घर, हॉटेल, कार्यालय अशा एकूण सात ठिकाणी घरझडती सुरू करण्यात आली आहे.


## संपादकीय ......

# विकासाचे मंदिर !

मंदिर आणि विकास परस्परपूरक घटक असतात. मात्र, अयोध्येतील राम मंदिराने हे दोन्ही घटक सर्वसमावेशक विकासासाठी परस्परपूरक असल्याचे सिद्ध केले आहे. राम मंदिर केवळ एका धर्माचे राहिलेले नाही. ते विकासाचे मंदिर झाले आहे. धार्मिक स्थळांमध्ये अर्थव्यवस्थेला गती देण्याची क्षमता असते, हे आजवर कळत असले, तरी कुणालाही ते वळत नव्हते. त्यासाठी राजकीय परिस्थिती किंवा तुष्टीकरणाचे राजकारण कारणीभूत होते. धर्म ही अफूची गोळी असल्याचे कार्ल माक्र्सने म्हटले होते. त्याच कालबाह्य झालेल्या विचारांवर काही जणांनी उड्या मारत राम मंदिराबाबत जीभ सोडली होती. मात्र, धर्म हे चैतन्याचे बीज असल्याचे अयोध्येतील राम मंदिराने सिद्ध केले आहे. याच चैतन्याने येथील अर्थकारणाला एक नवीन वेग दिला आहे. भारताला विकसित देश बनवण्याच्या मोहिमेला अयोध्येतून नवीन गती मिळत आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अलिकडेच म्हटले होते. त्यांचे हे वाक्य शब्दशः खरे ठरत आहे. अयोध्येतील राम मंदिरामुळे केवळ अयोध्येचाच नव्हे, तर संपूर्ण उत्तरप्रदेशाचा कायापालट होणार आहे. केवळ एका मंदिरामुळे अयोध्येतील लोकांचे जीवनमान प्रचंड उंचावणार आहे.

अयोध्येत १५ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या विकासकामांची पायाभरणी व उद्घाटन करण्यात आले आहे. आज देशातील धार्मिक स्थळांचे सौंदर्यीकरण केले जात आहे आणि केवळ इतकेच नव्हे तर डिजिटल तंत्रज्ञानाचा वापरही या तीर्थस्थळांकडून केला जात आहे. अयोध्येत केवळ राम मंदिराचीच उभारणी केली गेली नाही. येथील पायाभूत विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी मिळाला. येथे पायाभूत प्रकल्प अत्यंत वेगाने उभारले जात आहेत. राम जन्मभूमीबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय आणि फैजाबादचे अयोध्या हा केवळ एकच नामबदल नव्हता, तर एका भौगोलिक स्थानाच्या आणि राज्याच्या संपूर्ण कायापालटाची ती नांदी होती. पूर्वीच्या फैजाबादमध्ये फारसे कुणी फटकायचे नाही. आता अयोध्या हे एक जागतिक पातळीवरील धार्मिक पर्यटनस्थळ म्हणून विकसित होत आहे. हे एक जागतिक दर्जाचे पर्यटन शहर झाले असून, दररोज लाखो पर्यटकांना आकर्षित करेल आणि डझनभरापेक्षा जास्त शेजारच्या जिल्ह्यांच्या अर्थव्यवस्थेत क्रांती घडवून आणेल. अयोध्येच्या मास्टर प्लॅन २०३१ नुसार येथील पुनर्विकास १० वर्षांत पूर्ण केला जाईल आणि या महिन्यात राम मंदिराच्या उद्घाटनानंतर सुमारे तीन लाख लोकांची रोजची गरज भागवण्यासाठी या शहराच्या आधुनिकीकरणासाठी ८५ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक केली जाणार आहे.या व्हिजनमध्ये अयोध्या विकास प्राधिकरणाच्या ८७५ चौरस किमी क्षेत्रामध्ये पायाभूत सुविधा आणि पर्यटन विकासाची ओळख पटवण्यात आली. यामध्ये १३३ चौरस किमीचे मुख्य नियोजित शहर क्षेत्र आणि ३१.५ चौरस किमी मुख्य शहराचा समावेश आहे. अयोध्येला नवे रूप देण्यासाठी राज्य आणि केंद्राच्या ३७ यंत्रणा काम करीत आहेत. केवळ शहराचा कायापालट करण्यासाठी ३१,६६२ कोटी रुपयांचा खर्च केला जाईल.

# शरयूची आत्मकथा



*२२ जानेवारीला श्रीरामललाची पुनरप्रतिष्ठापना होणार. देश अतीव आनंदात आहे. रामललाच्या स्वागताची जोरदार तयारी सुरू आहे. अयोध्येतून सतत वाहणाऱ्या शरयुने श्रीराम जेव्हा चौदा वर्षांचा वनवास संपवून आणि रावणावर विजय मिळवून अयोध्येला परत आले तो क्षण हजारो वर्षांपूर्वी अनुभवला होता. आजही शरयुला तो आनंदोत्सव स्मरत असेल. नंतर तिने काळाच्या ओघात बरेच चढउतार पाहिले. दीर्घ काळाचा अपमान सहन केला. शेकडो वर्षांचा दुस्वास सहन केला. केवळ आणि केवळ श्रीरामाच्या सहवासाने पुनीत झालेल्या शरयुला आपले जीवन संपवावे असे देखील वाटले असेल. पण तिचा दुर्दम्य विश्वास होता.शबरीची भक्ती तिने पाहिली होती. भिल्ल कुटुंबात जन्माला आलेली कोवळी पोर आपल्या लग्नात आपणच पिल्लू असल्यापासून पाळलेली बकरी पाहुण्यांसाठी कापली जाणार यामुळे व्यथित झाली. आपण लग्नच नाही केले तर आपल्या लाडक्या बकरीचे प्राण वाचतील म्हणून तिने घरून पळ काढला. लहानशी शबरी मतंग ऋषींच्या आश्रमात आश्रयाला आली. तिथे तिने खूप सेवा केली. तपश्चर्या केली. शबरीने आयुष्याचा प्रत्येक क्षण श्रीरामांची प्रतीक्षा करण्यात घालवला. ती रोज श्रीरामांच्या स्वागताची तयारी करायची. दिवस उगवायचा तसा मावळायचा. ती दररोज त्याच जिद्दीने, निराश न होता पुन्हा श्रीरामाच्या प्रतिक्षेतच असायची. एक दिवस राम येतील हा तिचा विश्वास कधीच ढळला नाही. एक दिवस तिचा विश्वास सार्थ ठरला. श्रीराम शबरीच्या कुटीत आले. शबरी धन्य झाली. तिची नवविधा भक्ती सार्थ ठरली होती.शबरीच्या विश्वासाची साक्षीदार शरयू होती. म्हणूनच शरयूचा विश्वास पण कधीच ढळला नाही. असंख्य संकटांना झेलत तिच्या आराध्य रामाची होत असलेली हेळसांड ती याच विश्वासावर सहन करत होती. शरयुने आपल्या चार लक्ष सुपुत्रांनी तिच्या लाडक्या रामरायासाठी दिलेले बलिदान पाहिले. जेवढे रक्त सांडत होते, तेवढेच तिचे अश्रू वाहत होते. तिने बाबराचे आक्रमण पाहिले. मीर बांकीचा सैतानी उच्छाद पाहिला. विक्रमादित्याने कसोटीच्या खांबांवर बांधलेले रामरायाच्या जन्मभूमीवरचे दौलदार, सुंदर व भव्य मंदिर ध्वस्त करतानाचा प्रसंग शरयू आजही विसरलेली नाही. पापी औरंग्याचा मंदिर द्वेष तिने पाहिला. श्रीरामाचे आराध्य असलेल्या काशी विश्वेश्वराचे मंदिर औरंग्याने ध्वस्त केल्याचे तिने ऐकले होते. तोच औरंग्या पुन्हा बाबरी ढाचा राखण्यासाठी सपासप मुंडके छाटताना तिने पाहिला होता. या नरसंहाराने ती दीर्घकाळ विव्हळली असेल ! पण या वेदना कोणाला सांगायच्या ? शेवटी श्रीरामावरच विश्वास ठेवायचा आणि काळ बदलण्याची प्रतीक्षा करायची !त्याच काळात दक्षिणेत एका हिंदू नृसिंहाने याच औरंग्याला सळो की पळो करून सोडले असल्याच्या सुरस, रोमांचक आणि आशादायी कथा तिला ऐकू येत होत्या. छत्रपतींच्या सिंहासनाधिश्वर होण्याने देखील ती सुखावली होती. चारशे वर्षांच्या काळरात्रीत तिला असा आशेचा किरण मिळाला की आता अपमानांचा बदला चुकता होणार म्हणून ती उल्हसित व्हायची !एकदा तिने रामाचा चौदा वर्षांचा वनवास अनुभवला पण हा दुसरा वनवास साडे पाचशे वर्षांचा होता. रामराज्य जिथे नांदले त्याच भूमीला आलेले रणांगणाचे स्वरूप व्यथित करणारे होते. 'असुनी खास मालक घरचा, म्हणती चोर त्याला' असा दैव दुर्विलास तिने गोरे परतल्यावरही अनुभवला होता. गोऱ्यांचा श्रीरामद्वेष देखील अनुभवला. गोरे गेल्यावर सरदार वल्लभभाई पटेल या भारतमातेच्या सुपुत्राने सोरटी सोमनाथ मंदिराचे निर्माण केले. परकीय आक्रमकांचा कलंक पुसण्याचा वल्लभभाईंचा मनसुबा होता. पण, गोऱ्यांच्याच मानसिकतेत वावरणाऱ्या राज्यकर्त्यांनी रामललाला पुन्हा बंदिवासात टाकले. भरतभूमीत रामाच्या जन्माचे पुरावे मागितले जावे, यापेक्षा अध:पतन ते कोणते !आपल्या संतापाला आवर घालत तिने नेहरूंना बाबराच्या कबरीवर नतमस्तक होताना पाहिले. रामलला सळाखांच्या आत कुलूपबंद आणि बाबराला अभिवादन ! एकेकाळी विश्वगुरू पदावर आरूढ असलेल्या भरतभूमीत नियतीने सारेच चक्र उलटे फिरवले होते. नेहरूंपाठोपाठ इंदिराजी पण बाबराच्या कबरीवर गेल्या. कालपरवा त्यांचा नातू राहुल गांधी देखील बाबराच्या कबरीवर माथा टेकवायला गेला. शरयूचा संताप अनावर होणे स्वाभाविक आहे.पण शरयू ने आपला विश्वास ढळू दिला नाही. रामकाजासाठी श्रीरामभक्त बजरंग हिंदू शक्तीच्या रुपात अवतरला. बाबराचा कलंक पुसला गेला. आता शरयुवर झालेल्या जखमा भरून निघाल्या आहेत. ज्या भरतभूमीत पहिल्या पंतप्रधानाने रामललाला बाहेर काढा म्हटले होते त्याच देशाचा पंतप्रधान आता रामललाची प्रतिष्ठापना करणार आहे. रामाच्या काळात असलेले अयोध्येचे वैभव परत प्राप्त होणार आहे. राम नव्हते वैभव नव्हते. राम येणार तर भरतभूमीला वैभव पण येणार म्हणून शरयू आनंदली आहे. तिचा उत्साह ओसंडून वाहतो आहे.*



**शिवराय कुळकर्णी**
प्रवक्ता, भाजपा, महाराष्ट्र
९८८१७१७८२७

### महाराष्ट्र राज्यस्तरीय आंतरविद्यापीठीय आविष्कार २०२४

# स्पर्धेत शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचा प्रतीक रघुवंशी राज्यात प्रथम

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथे दि. १२ ते १५ जानेवारी या कालावधीत राज्यस्तरीय महाविद्यालय व विद्यापीठातील तरुण संशोधकांचे आविष्कार २०२४ स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

कल्पकता, नाविन्यता, विचार, शोध, प्रतिभा, प्रगटीकरण, संशोधन या सर्व गुणांची कमी अधिक असणाऱ्या या स्पर्धेत अभियांत्रिकी विषयातील पदवी गटात अमरावतीच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील अणुविद्युत विभागाच्या अंतीम वर्षाचा विद्यार्थी 'प्रतीक रघुवंशी' याने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्याच्या संशोधनाचा विषय एबल ग्लारोरा–ए नॉन सर्जिकल अँड नॉन अधेझिव्ह टाईप स्मार्ट बोन कंडनशन हिअरिंग एड युझिंग डोग ट्रान्राड्युरार असा होता. प्रतिकच्या उत्तुंग यशाबद्दल महाविद्यालयीन शिक्षकगण व अभियांत्रीकी क्षेत्रातील संशोधकांनी कौतूक केले आहे.

वर्तमानातील उद्योजकांना व लोकांना ज्या समस्या भेडसावतात त्यावर उपाय शोधण्याकरिता कल्पकतेला संशोधनाची जोड देण्यासाठी आवश्यक असलेला सक्षमपणा, स्टार्टअप व पेटंटसाठी असलेली गुणवत्तां 'प्रतीक रघुवंशी' याच्या संशोधनात जाणकार परीक्षकांना आढळून आली. या स्पर्धेत २३ विद्यापीठांतील जवळजवळ ७०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.





प्रतीक रघुवंशी हा आविष्कार २०२४ स्पर्धेत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ चमूचा सदस्य होता. याचा त्यालाअखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे उपाध्यक्ष आणि चिफ इनोव्हेशन ऑफिसर डॉ. अभय जेरे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, रोख पारितोषिक आणि प्रमाणपत्र देवून सत्कार करण्यात आला. प्रतीक रघुवंशी यास प्रथम क्रमांकासाठी ३५ हजार रुपये संशोधनवृत्ती देखील जाहीर झालेली आहे. ही रांशोधनवृत्ती त्याला विद्यापीठामार्फत प्रदान करण्यात येईल. प्रतीकच्या या यशात त्याचे मार्गदर्शक प्रा. ए. एम. शाह, विभाग प्रमुख डॉ. पी. आर. देशमुख, अधिष्ठाता संशोधन डॉ. आर. एम. गेटकर, व संस्थेचे प्राचार्य डॉ. ए. एम. महल्ले यांचे मोलाचे योगदान लाभले, असे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आशिष महल्ले यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.





# कडाक्याच्या थंडीत सतत घसा खवखवतोय? 'हे' ५ घरगुती उपाय तुमच्यासाठी गुणकारी

**दि.१८ विदर्भ प्रजासत्ताक** थंडीचा जोर हळूहळू वाढू लागला आहे. महाराष्ट्रासह देशाच्या अनेक भागांत कडाक्याची थंडी वाढू लागली आहे. त्यामुळे पुन्हा एकदा ताप, सर्दी, खोकला यांसारख्या संसर्गाचा धोका पुन्हा वाढला आहे. थंडीत जाणवणारा आणखी एक त्रास म्हणजे घसा कोरडा होणे. अनेकजण या समस्येने त्रस्त असतात. अशा परिस्थितीत घसा खवखवणे आणि सर्दी–खोकला आपल्या दैनंदिन कामावर खूप परिणाम करतात.



अशा परिस्थितीत, लोक यापासून आराम मिळविण्यासाठी अनेक औषधं घेतात. मात्र, अनेकदा त्याचा आपल्या शरीरावर सकारात्मक परिणाम होत नाही. अशा वेळी आम्ह तुम्हाला काही घरगुती उपाय सांगणा आहोत. ज्याचा वापर करून तुम्ही या समस्येवर आराम मिळवू शकता.

**मिठाच्या पाण्याने गुळण्या करा**

घसादुखीपासून तात्काळ आराम मिळवायचा असेल तर मिठाच्या पाण्याने गुळण्या करू शकता. या समस्येपासून त्वरित आराम मिळवण्याचा हा सर्वात सोपा आणि प्रभावी मार्ग आहे. हे घशात उपस्थित जंतू कमी करण्यास देखील मदत करू शकतात.

**बेकिंग सोडासह गुळण्या करा**

घसा खवखवण्याच्या समस्येपासून तुम्हाला आराम मिळवायचा असेल तर मिठाच्या पाण्याने गुळण्या तर सगळेच करतात. पण, जर तुम्ही बेकिंग सोडा आणि मिठाच्या पाण्याते गुळण्या केल्या तर तुम्हाला लवकर आराम मिळेल. बेकिंग सोडा आणि मीठ पाणी घसा खवखवण्याच्या समस्येपासून आराम मिळवून देऊ शकतात. हा उपाय जीवाणू कमी करू शकतो आणि बुरशीची वाढ रोखू शकतो.

**कॅमोमाईल चहा**

कॅमोमाईल चहा आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. हा चहा अनेक समस्यांवर उपचार म्हणून रामबाण उपाय आहे. घसा खवखवणे त्यापैकीच एक आहे. हा चहा तुमची प्रतिकारशक्ती देखील वाढवण्यास मदत करतो. ज्यामुळे तुमच्या शरीराला घसा खवखवणार्या विषाणू आणि बॅक्टेरियाशी लढण्यास मदत होते.

**मध**

मध आपल्या औषधी गुणधर्मांसाठी ओळखला जातो. तुम्ही मधाचा चहा किंवा मध पाण्यात मिसळूनही पिऊ शकता. अनेक संशोधनांमध्ये असे आढळून आले आहे की, मुलांमध्ये खोकला नियंत्रणात ठेवण्यासाठी मध हे खोकला कमी करणाऱ्या डेक्स्ट्रोमेथोरफान इतकेच प्रभावी आहे.


**लसूण**

लसणात नैसर्गिक अँटी–बॅक्टेरियल गुणधर्म आहेत. तसेच, यामध्ये ऍलिसिन देखील आहे, जो विषाणूजन्य संसर्गाशी लढण्यास आपल्याला सक्षम बनवण्यास मदत करतात.

# अखेर अमरावती शहरात कोरोनाच्या नव्या व्हेरियंटचा शिरकाव

## २९ सॅम्पल पैकी जेएन–१ चे ३ तर जेएन–१.१ चे ६ रुग्ण पॉझिटिव्ह

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :** देशभरात धुमाकूळ घातलेल्या कोरोनाच्या नव्या जेएन–१ आणि जेएन–१.१ या व्हेंरियटचा अमरावती शहरातही शिरकाव झाला आहे. यामध्ये जेएन–१ चे तीन रुग्ण तर जेएन–१.१ व्हेंरियटचे सहा रुग्णांची नोंद करण्यात आली आहे. जिल्ह्यात आतापर्यंत ३१ कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांची नोंद झाली आहे.



सध्या देशभरात कोरोनाचा नवा व्हेंरियंट जेएन–१ च्या रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. राज्यातही या नव्या व्हेंरियंटचे रुग्ण आढळून आल्यानंतर राज्य शासनाने आरोग्य विभागाला सतर्कतेचा इशारा दिला होता. त्याअनुषंगाने जिल्हातील आरोग्य यंत्रणाही नवा व्हेंरियंट रोखण्यासाठी सज्जय होते. मागील एक महिन्याच्या कालावधीमध्ये जिल्ह्यात ३१ कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण आढळून आले होते. यातच खबरदारी म्हणून आरोग्य प्रशासनाने २९ पॉझिटिव्ह रुग्णांचे अहवाल हे जेएन–१ तसेच जेएन–१.१ या नव्या व्हेरियंटचे आहेत का? याची खात्री करण्यासाठी या रुग्णांचे स्वॅब हे पुण्यातील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ व्हिरोलॉजी येथे पाठविले होते. त्याअनुषंगाने आरोग्य प्रशासनाला प्राप्त झालेल्या अहवालानूसार २९ पैकी जेएन–१ चे तीन रुग्ण तर जेएन–१.१ व्हेंरियटचे सहा रुग्ण असल्याची नोंद करण्यात आली आहे. या सर्व रुग्णांची प्रकृतीमध्ये सुधारणा देखील झाली असून त्यांना रुग्णालयातून सुट्टी देखील झाली आहे. त्यामुळे नागरिकांनी खाबरुन न जाता, कोरोना सुरक्षेच्या दृष्टीने कोविड नियमांचे पालन करण्याचे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे यांनी केले आहे.

# दुचाकी फिरवायचे, पेट्रोल संपले की पार्क करायचे; २ अल्पवयीन मुलांना अटक

## दोन विधिसंघर्षित बालकांकडून नऊ दुचाकी जप्त

**दि. १८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती : –** सीसीटीव्हीत दुचाकी चोरताना बंदिस्त झालेल्या दोन विधिसंघर्षित बालकांकडून चोरीच्या नऊ दुचाकी जप्त करण्यात आल्या. पंचवटी चौक ते कठोरा नाका या परिसरातून दुचाकी चोरी करून ते विधी संघर्षग्रस्त बालक हे त्यातील पेट्रोल संपेपर्यंत वाहन फिरवायचे आणि गर्दीच्या ठिकाणी किंवा अपार्टमेंटच्या पार्किंगमध्ये पार्क करून ठेवत असल्याचे चौकशीदरम्यान निष्पन्न झाले. शहरातील वाहन चोरीच्या घटनांना आळा बसावा म्हणून पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीमध्ये विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार गाडगेनगरचे ठाणेदार गजानन गुल्हाने हे दुचाकी चोरीच्या गुन्ह्यात अधिक तपास करीत असताना त्यांनी घटनास्थळा शेजारी सुरू असलेल्या नवीन बांधकामाच्या ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यात १५ ऑक्टोबर २०२३ रोजीच्या फुटेजमध्ये दोन बालक हे काळ्या रंगाची दुचाकी चोरून घेऊन जाताना दिसून येत होते. चौकशी दरम्यान ते स्थानिक शेगाव परिसरातील विधी संघर्षग्रस्त बालक असल्याचे समजले. त्यांना विचारणा केली असता त्यांनी ती दुचाकी चोरी केल्याचे कबूल केले.आपण इतर विधी संघर्षग्रस्त बालकांना सोबत घेऊन आणखी काही दुचाकी वाहने चोरल्याची कबुली त्या दोघांनी दिली. त्यांना विश्वासात घेऊन प्रत्यक्ष घटनास्थळी नेऊन खात्री करण्यात आली तथा त्यांच्या ताब्यातून गाडगेनगर मध्ये दाखल असलेल्या नऊ गुन्ह्यातील दुचाकी जप्त करण्यात आल्या. ही कारवाई सीपी नवीनचंद्र रेड्डी, उपायुक्त सागर पाटील व सहायक पोलिस आयुक्त पूनम पाटील यांच्या मार्गदर्शनात ठाणेदार गजानन गुल्हाने यांच्या नेतृत्वातील टीम गाडगेनगरने केली.



# आयडीबीआयचे एटीएम फोडण्याचा प्रयत्न

## १६ लाख सुरक्षित, विद्युत कटरचा वापर

**दि.१८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,–** राजकमल चौक ते गांधी चौका दरम्यानच्या टांक प्लाझा संकुलातील आयडीबीआय बँकेचे एटीएम फोडण्याचा प्रयत्न चोरट्याने केला. एटीएममधील १६ लाख रुपये सुरक्षित राहिले. बुधवारी सकाळी १० वाजता ही घटना उघड झाली. या घटनेने मात्र खळबळ उडाली आहे. गांधी चौक मार्गावरील टांक प्लाझा संकुलातच आयडीबीआय बँक आहे. लगतच आयडीबीआय बँकेचे एटीएम सुद्धा आहे.

आयडीबीआय बँकेवर सायंकाळी साडेसहा वाजतापर्यंत सुरक्षारक्षक असतो. एटीएमवर सुरक्षारक्षक नाही. बँकेचे व्यवस्थापक राम सदार यांनी बुधवारी सकाळी ९.४५ च्या सुमारास बँकेचे एटीएम कोणीतरी फोडण्याचा प्रयत्न केल्याची माहिती सहाय्यक व्यवस्थापकाला दिली. ते तातडीने तेथे पोहोचले. त्यावेळी सुरक्षारक्षक सुभाष वाकोडे यांनी त्यांना एटीएम कोणीतरी फोडण्याचा प्रयत्न केल्याचे सांगितले. घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलिस आयुक्त शिवाजीराव बचाटे,



कोतवालीचे ठाणेदार विजयकुमार वाकसे आपल्या सहकार्यांना सोबत घेऊन श्वान व फिंगर प्रिंट एक्सपर्टसह पोहोचले. तपासणी केली. पैसे सुरक्षित असल्याचे समोर आले. बँकेचे सहाय्यक व्यवस्थापक जयंत राघोर्ते यांच्या तक्रारीवरून कोतवाली पोलिसांनी अज्ञात चोराविरूध्द चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. एटीएममध्ये लावलेले सीसीटीव्ही फुटेज पाहिले असता एक अनोळखी इसम तोंडाला बांधून एटीएमसोबत काहीतरी छेडछाड करताना दिसला. कोतवाली पोलिसांनी त्या सीसीटीव्ही फुटेजवरून आरोपीचा शोध सुरू केला आहे. आरोपीने आत शिरण्यापुर्वी तेथील सीसीटिव्हीची दिशा बदलविली होती, असे तपासात समोर आले.

### वरूड, तिवसाची घटना ताजीच

९ जानेवारी रोजी तिवसा व वरूड येथील दोन एटीएम गॅस कटरने कापण्यात आल्याची घटना घडली होती. येथून तब्बल ४० लाख रुपये लांबविण्यात आले होते. ही घटना ताजीच असून त्या चोरीचा उलगडा अद्यापही झालेला नाही. यापूर्वी झालेल्या एटीएम फोडण्याच्या घटनेचाही उलगडा झालेला नाही. IDBI -TM एटीएमच्या सुरक्षेचा प्रश्न आता चर्चेचा विषय होत आहे.

# विभागीय आयुक्तालयाच्या पथकांकडून झेडपीत कामकाजाची तपासणी

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** गत मंगळवार ९ जानेवारीला तपासणी केल्यानंतर १५ जानेवारीपासून जिल्हा परिषदेत विभागीय तपासणी चमू दाखल झाली आहे. या तपासणी पथकाकडून ९ विभागांमार्फत केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची वास्तविकता जाणून घेण्याचा प्रयत्न या तपासणी दरम्यान केला जातो. योजनांची लाभार्थ्यांपर्यंत पोहोचलेली माहिती व अन्य प्रशासकीय कामकाजाची पडताळणी केली जात आहे.केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची वास्तविकता जाणून घेण्याचा प्रयत्न या तपासणीदरम्यान केला जातो. त्याचाच एक भाग म्हणून शासकीय योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचलेली माहिती, त्यानुसार त्या योजनेला मिळालेला प्रतिसाद आदी बाबी या




तपासणीदरम्यान स्पष्ट होतात. त्यासाठी जिल्हा परिषदेच्या वेगवेगळ्या विभागांमध्ये या तपासणीच्या अनुषंगाने तयारी केली जात आहे. तर, काही विभागात तपासणी सुरू झाली आहे. वार्षिक तपासणीचाच हा एक भाग असल्यामुळे अधिकारी, कर्मचाऱ्यांना यातील बारकावे चांगल्या प्रकारे माहीत आहेत. त्यामुळे प्रत्येक विभागात सध्या तपासणीची धामधूम सुरू आहे. विभागीय आयुक्त कार्यालयाच्या तपासणी पथकाने १५ व १७ जानेवारी रोजी भूजल सर्वेक्षण विभाग, समाज कल्याण, कृषी विभाग, महिला व बालकल्याण विभागाची तपासणी केली आहे. त्यानंतर १८ ते २५ जानेवारी दरम्यान वित्त, शिक्षण विभाग माध्यमिक, सर्व शिक्षा अभियान, आरोग्य, पशुसंवर्धन, ग्रामीण पाणीपुरवठा, पंचायत, जि.प. हायस्कूल, ग्रामपंचायत, बांधकाम, प्राथमिक शिक्षण आणि सामान्य प्रशासन व जलसंधारण आदी विभागातील योजना व कामकाजाची तपासणी केली जाणार आहे

# दोन युवक पायदळ निघाले अयोध्येला

## राहुल जोशी व अनिकेत धांडेकरचे साहस



**दि.१८ विदर्भ प्रजासत्ताक मेळघाट–** रामभक्तीमुळे प्रभावित झालेले मेळघाटातील दोन युवकांनी चक्क अयोध्येकडे पायी प्रवास करुन आगळ्या–वेगळ्या शक्तीचा परिचय देत आहे. त्यांचे सर्वत्र अभिनंदन तथा कौतुक होत आहे. एक हजार किमी पेक्षा जास्त प्रवास करण्यासाठी निघालेले राहुल व अनिकेत यांनी आज मध्य प्रदेशाच्या भैसदेही भागात प्रवेश केला. धारणीपासून ८० कि. मी. अंतरावरील कुलंगना (ता. चिखलदरा) येथील अनिकेत सिताराम धांडेकर (२४) तथा राहुल प्रकाश जोशी (२८) हे दोन्ही युवक थंडीचे कपडे आणि हातात भगवा झेंडा घेऊन अयोध्येकडे पायदळ निघालेले आहे. तब्बल १ हजार कि. मी. ची पायदळ यात्रा करुन रामललाचे दर्शन घेताना मेळघाटातील आदिवासींसाठी सुख समृद्धी मागणार आहेत. मेळघाटच्या कुलंगणा येथून निघताना राहुल व अनिकेतचा उत्साह व रामभक्ती पाहण्यासारखी होती. सध्या मेळघाटात अक्षत कलश यात्रेनंतर अक्षत वितरण व मंदिर स्वच्छता सुरू झालेली असून संपूर्ण परिसर राममय होण्याकडे वाटचाल करत आहे. राहुल आणि अनिकेतने कुलंगणाचा निरोप घेताना २२ जानेवारी रोजी दिवाळी साजरी करण्याचा सल्ला लोकांना दिला. ३० जानेवारीपर्यंत दोघे पायी अयोध्या पोहचतील असा अंदाज आहे.

# जिल्ह्यातील अयोध्या निमत्रकांचा खा.नवनीत राणांनी केला सत्कार



**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** दिनांक २२ जानेवारी रोजी अयोध्या येथे प्रभू श्री राम मंदिराच्या लोकार्पण सोहळ्यात सहभागी होण्याचे निमंत्रण अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव सूर्जी येथील परमपूज्य जितेंद्रनाथ महाराज,कौंडण्यपूर येथील परमपूज्य राज राजेश्वर माऊली सरकार,तसेच शिवधारा आश्रम चे संत परमपूज्य डॉ संतोषजी महाराज यांना मिळाले असून ही संपूर्ण जिल्हावासियांसाठी अत्यंत अभिमानाची बाब असून एक प्रकारे हा अमरावती जिल्ह्याचा गौरव आहे*

*हिंदू शेरनी खासदार सौ नवनीत रवी राणा यांनी आज अंजनगाव सूर्जी येथील परमपूज्य जितेंद्र नाथ महाराज,राजराजेश्र्वर माऊली सरकार व डॉ संतोषजी महाराज यांच्या मठात जावून महाराजांचा शाल,श्रीफळ देवून सत्कार केला, व आशीर्वाद घेतले

या धार्मिक महोत्सवात पंतप्रधान श्री नरेंद्रजी मोदी यांच्यासमवेत परमपूज्य जितेंद्रनाथ महाराज,राजेश्वर माऊली सरकार व डॉ संतोष जी महाराज यांची उपस्थिती म्हणजे संपूर्ण अमरावती जिल्हा व विविध संप्रदायाची उपस्थिती असल्याचे प्रतिपादन खासदार सौ नवनीत रवी राणा यांनी यावेळी केले, व या भव्य दिव्य धार्मिक उत्सवास संपूर्ण अमरावती जिल्हावासीयांच्या वतीने खासदार सौ नवनीत रवी राणा यांनी शुभेच्छा दिल्या

# अचलपुरच्या ८ शाळांचा वीज पुरवठा खंडीत

## नगर परिषद प्रशासनाचे दुर्लक्ष

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक अचलपूर, –** अचलपूर – परतवाडा जुळ्या शहरातील अचलपूर नगर परिषद अंतर्गत येणार्या ८ शाळांचा विद्युत पुरवठा महावितरण कडून खंडित करण्यात आला आहे. वीज बिल न भरल्यामुळे ही कारवाई करण्यात आली आहे. जिल्ह्यातील 'अ' वर्ग दर्जा असलेली अचलपूर नगर परिषद ही एकमेव आहे. वीज पुरवठा खंडीत झाल्याचा फटका विद्यार्थांना बसत आहे.

जुळ्या शहरातील जवळपास ४४ शाळा अचलपूर नगर परीषद अंतर्गत कार्यरत आहे.न. प. प्रशासनावर शाळांचे वीज बिल भरण्याची जबाबदारी आहे. महावितरण उपविभागाने पत्रव्यवहारा केल्यानंतर न. प. प्रशासनाने थकीत वीज बिल भरण्यासाठी पुरेसा निधी, शासकीय अनुदान प्राप्त व पूर्णतः वसूल न झाल्याचे कारण समोर ठेऊन वीज पुरवठा खंडीत न करण्याची विनंती केली होती. थकबाकी वाढल्यामुळे अचलपूर नगर परीषदेच्या जवळपास ८ शाळांचा विद्युत पुरवठा खंडित करण्यात आला आहे. या संख्येत वाढ होणार असल्याचे चित्र आहे.



शाळेतला वीज पुरवठा खंडित असल्याने पंखे, लाईट, पिण्याच्या पाण्याची आरो मशीन बंद आहे. महावितरण उपविभाग, परतवाडा येथील अधिकार्याशी चर्चा केली असता ते म्हणाले, अचलपूर नगर परिषदेला ८० ते ८५ विविध वीज जोडणीचे देयके वेळेवर दिली जातात. यामध्ये स्ट्रीट लाईट, पाणी पुरवठा व शाळेच्या थकीत वीज बिलाचा समावेश आहे. अनेकवेळी पत्र व्यवहाराचा माध्यमातून सूचना देऊन सुध्दा निधी उपलब्ध नसल्याची लेखी माहिती अचलपूर नगर परीषद विभागाकडून देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

### विद्युत अभियंत्याचे पद रिक्त

अचलपूर नगर परिषद विद्युत विभागातील अभियंत्याचे पद रिक्त असून या पदाची जबाबदारी सध्या बांधकाम विभागातील अभियंत्यावर आहे. वीज पुरवठा खंडित झाल्या संदर्भात विचारणा केली असता त्यांनी माहिती घेणार असल्याचे सांगितले. विद्युत विभागात कायमस्वरुपी अभियंत्याची नियुक्ती करण्याची मागणी आहे.

# पीक विमा अतिवृष्टीच्या मदतीसाठी शिवसेनेची तहसील कार्यालयात धडक

## नांदगाव तालुक्यातील शेतकऱ्यांचा सामूहिक आत्मदहणाचा इशारा

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक नांदगाव खंडेश्वर –** *सरसकट पीक विमा देण्यात यावा व अतिवृष्टीच्या मदतिपासून वंचित शेतकऱ्यांना तात्काळ अतिवृष्टीची मदत तात्काळ देण्यात यावी अन्यथा तालुक्यातील शेतकरी सामूहिक आत्मदहन करणार असा इशारा शिवसेना ठाकरे गटाचे प्रकाश मारोटकर यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांनि तहसील कार्यालयात धडक देऊन तहसीलदार भुसारी यांना निवेदनाद्वारे दिला आहे तालुक्यातील एकूण २६ हजार शेतकऱ्यांनि पावसाने विविध पिकांचे नुकसान झाल्याच्या तक्रारी विमा कंपनीकडे केल्या त्यातील फक्त ८ हजार शेतकऱ्यांना विम्याची रक्कम मिळाली उर्वरित १६ हजार शेतकऱ्यांचे अर्ज विमा कंपनीने राजेक्ट केले मात्र सदर अर्ज पीक नुकसानीची पाहणी न करता विमा कंपनीने अर्ज राजेक्ट केले सदर अर्जाची चौकशी करण्यात यावी व सरसकट पीक विमा देण्यात यावा अन्यथा सात दिवसा नंतर तालुक्यातील शेतकरी सामूहिक आत्मदहन करणार अशे निवेदन तहसीलदार यांना देण्यात आले तसेच अतिवृष्टीची मदत अद्याप मिळाली नसून यादीतून अनेक शेतकऱ्यांची नावे नाही अश्या शेतकऱ्यांची नावे शासनाकडे पाठविण्यास तलाठी टाळाटाळ करीत आहे सदरहू शेतकऱ्यांची नावे तात्काळ शासनाकडे पाठवीण्यात यावे असेही निवेदनात नमूद आहे यावेळी शिवसेनेचे प्रकाश मारोटकर माजी सरपंच श्रीकृष्ण सोळंके मनोहर सावंत मनदेव चव्हाण अक्षय राणे अक्षय काकडे पवन पुसदकर चेतन केळकर आशिष हटवार आशिष भाकरे प्रफुल ठाकरे भूषण मोरे भागवत लाहे राजू उभाळे चेतन डकरे भुमेश्वर गोरे अक्षय हिवराळे विकास रावेकर गजानन गावंडे आकाश रुमणे अंकुश कुर्जेकर आदित्य गावंडे आशिष येलोरे साहिल ढोरे दिनेश पोटे प्रमोद आढाऊ मंगेश तुपटकर भावेश भांबुरकर मनोज ढेकेअक्षय तुपटकर शुभम ढाकुलकर बबलू शेंडे राजेश पवार निखिल हिरोडे हर्षल देशमुख निलेश मारोटकर मंगेश सुरोशे शुभम सावरकर अनिल मारोटकर इत्यादी शेतकरी उपस्थित होते. कलर बॉक्सपीक विम्याच्या शेतकऱ्यांनि सादर केलेल्या तक्रारी गैरप्रकारे विमा कंपनीने राजेक्ट केल्याचे खुद्द तालुका कृषी अधिकारी यांनी पत्राद्वारे विमा कंमनीला कळविले आहे.*

# खेलो भारत क्रीडा महोत्सवाला प्रतिसाद

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** अखिल भारतीय विद्यार्थी परिषद व श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने महाराष्ट्र राज्य खेळ दिवस व खाशाबा जाधव यांच्या जयंतीनिमित्ताने १५ जानेवारीला विद्यार्थ्यांसाठी 'खेलो भारत क्रीडा महोत्सव २०२३–२४' चे आयोजन करण्यात आले होते. विदर्भस्तरीय या महोत्सवात महिला व पुरुष गटासाठी कुस्ती, मल्लखांब स्पर्धा झाल्या. खेळाडूंचा या दोन्ही स्पर्धांना चांगला प्रतिसाद मिळाला.

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या मैदानावर झालेल्या या घहशश्रे इहरीरीं डीीी ऋशी– ींळींरश्र महोत्सवात प्रमुख अतिथी म्हणून खेलो भारतचे राष्ट्रीय सहसंयोजक रितेश चौधरी, अभाविप विदर्भ प्रांत संघटन मंत्री विक्रमजीत कलाने, डिग्री कॉलेजचे प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे तर कुस्तीपटू बबिता कुमारी फोगट आभासी




## स्पर्धकांचा मोठ्या संख्येने सहभाग

## अभाविपच्या पुढाकाराने स्पर्धा

पद्धतीने उपस्थित होत्या. समारोपीय सत्रामध्ये हव्याप्रमच्या सचिव डॉ. माधुरी चेंडके, गणेश देवरुखकर, रितेश चौधरी, पायल किनाके यांच्याहस्ते सर्व विजेत्यांना सन्मानित करण्यात आले. अनेक विद्यार्थ्यांनी या क्रीडा महोत्सवामध्ये उस्फूर्त सहभाग नोंदविला. यामध्ये अश्विन सुभाष धर्मे, वरून गजेंद्र साहू, कुणाल निलेश दातारकर यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला तर मुलींमध्ये आरुशी सिंघई, नेहा दारसिंबे, निलाक्षी दारसिंबे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. यावेळी प्रमूख पंच म्हणून पंकज गाडे, अनिल नागपुरे तथा कपिल बोंरे, कांचन पंधरे, आरती मरकाम, नरेंद्र गाडे, मयूर दलाल, पूजा सुवनाते, हिमांशू राठोड आदींनी पंच म्हणून पदभार सांभाळला.अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे विविध आयाम व गतिविधी अनेक सामाजिक क्षेत्रात कार्य करतात. त्यापैकी एक म्हणजे खेळ गतिविधी. या माध्यमातून अखिल भारतीय विद्यार्थी परिषद खेळामध्ये आवड असणार्या विद्यार्थ्यांकरिता सातत्याने विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करते. विद्यार्थ्यांचा शारीरिक आणि मानसिक विकास करणे आणि त्यांना नियमित शारीरिक व्यायामाचे महत्त्व समजवणे हे प्रमुख उद्दिष्ट या महोत्सवामागचे होते.

# नागपूरच्या रणांगणात नितीन गडकरींसमोर काँग्रेसला तुल्यबळ उमेदवार सापडणार का ?

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक**
**नागपूर–** नागपूर लोकसभा मतदारसंघ विदर्भातील प्रमुख मतदारसंघापैकी महत्वाचा मतदारसंघ आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय आणि दीक्षाभूमी असे दोन प्रमुख वैचारिक केंद्र असलेला हा मतदारसंघ परंपरागतरित्या काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जात असे. मात्र २०१४ नंतर देशात झालेले राजकीय परिवर्तन व नागपूरला गडकरींसारखा दिग्गज नेता मिळाल्यानंतर नागपूरकर मतदारांनी भाजपलाभक्कम साथ दिली आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत नितीन गडकरी यांनी काँग्रेसचे उमेदवार नाना पटोले यांचा तब्बल २,१६,००९ मतांनी पराभव केला होता. २०१४ च्या तुलनेत गेल्या निवडणुकीत त्यांचे मताधिक्य काहीसे घटले होते.

नागपूर लोकसभा मतदारसंघात एकूण सहा विधानसभा मतदारसंघ येतात. यातील नागपूर पूर्व, नागपूर दक्षिण, नागपूर दक्षिण-पश्चिम, व नागपूर मध्य या चार मतदारसंघात भाजपचे आमदार आहेत. नागपूर पश्चिम व नागपूर उत्तर या दोन मतदारसंघात २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचे आमदार निवडून आले होते. राज्याचे




उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे नागपूर दक्षिण-पश्चिम विधानसभा मतदारसंघातून प्रतिनिधित्व करतात.

**नागपुरात भाजपची एकहाती सत्ता–** नागपूर शहरात भाजपचा वरचष्मा पहायला मिळतो. सद्यस्थितीत नागपूर महानगरपालिकेवर प्रशासन राज आहे. मात्र गेल्या १५ वर्षापासून महानगरपालिकेवर भाजपची एकहाती सत्ता असल्याने गल्लीपासून दिल्लीपर्यंत नागपुरात कमळ उमलल्याचे दिसते.

### नागपुरात भाजप विरुद्ध काँग्रेस

नागपुरात सर्वच निवडणुकांमध्ये कायमच भाजप विरुद्ध काँग्रेस अशी दुहेरी लढत पहायला मिळते. अन्य पक्षांना नागपुरच्या राजकारणात तेवढे स्थान नाही, त्यामुळे त्यांचे अस्तित्व इथे पहायला मिळत नाही. शिवसेना व राष्ट्रवादीत फूट झाल्यानंतर आधीच नगण्य असलेली या दोन्ही पक्षाची ताकत नागपुरात अधिक विभागल्या गेली आहे. या उलट नागपुरात आंबेडकरी विचारांचा वारसा जोपासणारे मतदार मोठ्या संख्येने पहायला मिळतात. मात्र रिपब्लिकन पक्ष व बहुजन समाज पक्षात हे मतदार विभागले जात असल्यामुळे निश्चित अशी ताकत नागपुरात पहायला मिळत नाही.




# शेवटी शिक्षण विभागाला आदर्श शिक्षक पुरस्कार वितरणाचा मुहूर्त सापडला

## जिल्हातील १४ शिक्षकांची निवड, २९जानेवारीला पुरस्कार वितरण सोहळा

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक**
**अमरावती –** जिल्हा परिषद मधिल उत्कृष्ट शिक्षकांना जि.प.स्तरावर जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार दिला जातो.यावर्षी सन २०२२-२३ मधिल प्राथमिक विभागातील १३व माध्यमिक विभागातुन १अश्या १४शिक्षकांना सहपत्नीक पुरस्कार वितरण सोमवार दिनांक २९जानेवारीला दुपारी ३वाजता मातोश्री विमलताई देशमुख सभागृह अमरावती येथे होणार आहे.५सप्टेंबर शिक्षक दिनाला हे पुरस्कार शिक्षकांना मिळाले पाहीजे होते पण तंबल्ल ५महीन्या नंतर हा पुरस्कार सोहळा होत आहे.

या जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळ्याचे अध्यक्ष अमरावती जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी अविश्यांत पंडा राहनार असुन विशेष अतिथी अति.मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष जोशी,प्रकल्प संचालक श्रीमती प्रिती देशमुख,उप मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.कैलास घोडके,मुख्य लेखा व वित्त अधिकारी चंद्रशेखर खंडारे,प्रमुख अतिथी डायटचे प्राचार्य मिलिंद कुबडे,उप.मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीराम कुलकर्णी,बाळासाहेब बायस उपस्थित राहणार आहे.या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रफुल्ल कचवे, उपशिक्षणा धिकारी गजाला नाजली खान, प्रिया देशमुख,बुध्दभूषण सोनोने, निखिल मानकर, अनिल कोल्हे,शिक्षण विस्तार अधिकारी मो.आस्फाक यांनी केले आहे. निवड प्राथमिक शिक्षकांन मध्ये-अचलपूर मधुन सौ.कल्पना चौधरी,अमरावती मधुन कु.रोशनी निंभोरकर, अंजनगाव विजयकुमार सरोदे,भातकुली दिपाली बाभुळकर,चांदुर बाजार कृ.वृषाली देशमुख, चिखलदरा युवराज अढाऊ, र्यापूर कलिम खान समद खान,धामणगाव रेल्वे विनोद भोयर,धारणी उमेश पटोरकर, मोर्शी श्रीमती ममता राऊत, नांदगाव खडे.तृप्ती शिंगणवाड ,तिवसा अतुल गुर्जर,वरुड खुशाल अंबाडकर तर माध्यमिक विभागातुन अमरावती हायस्कूलच्या शितल धरमठोक यांचा समावेश आहे.

# फळ पीक विम्याच्या मदतीसाठी शेतकऱ्यांच्या वरूड तहसील कार्यालयात ठिय्या आंदोलन!

## शेतकऱ्यांच्या खात्यात फळपिक विम्याची मदत व्याजासह जमा करा !

### वरूड तालुक्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी दिला २७ ला चक्काजाम आंदोलनाचा इशारा !

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक**
**वरूड –** वरूड तालुक्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना २०२२-२३ आंबिया बहार फळ पीक विम्याच्या मदतीपासून वंचित ठेवणाऱ्या विमा कंपनीवर गुन्हे दाखल करून संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या हक्काचे फळ पीक विम्याचे पैसे व्याजासह तत्काळ वाटप करणे बाबत शेतकरी संघर्ष समिती तर्फे शेकडो शेतकऱ्यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना तहसीलदार यांच्यामार्फत निवेदन देऊन तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला.

वरुड तालुक्यातील राजुरा बाजार, पुसला, वाठोडा, वरूड महसूल मंडळ या सर्व ठिकाणी आंबिया बहार फळ पिक विमा २०२२- २०२३ चे दोन ट्रिगर लागून सुद्धा मंजूर झालेले हेक्टरी ४० हजार रुपये ५ महिन्यांचा कालावधी लोटून सुद्धा अजून पर्यंत रिलायन्स जनरल इन्शुरन्स कंपनीने संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी ४० हजार रुपये अदा केलेले नाही. वरूड तालुक्यातील हजारो संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी हेक्टरी १२ हजार रुपये भरून २०२२ - २३ मध्ये आंबिया बहार संत्रा फळ पिक विमा मोठ्या प्रमाणात काढलेला होता. हवामानातील बदलामुळे उत्पादनात घट होऊन शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पादन हे मिळत नाही.

फळपिक नुकसान भरपाई मिळण्यासाठी एक उपाय म्हणून पुनर्रचित हवामान आधारीत फळ पीक विमा योजनेमध्ये मोठ्या अपेक्षेने विमा काढून सुद्धा संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना फळ पीक विमा मदत वेळेवर दिल्या जात नाही ही बाब अतिशय गंभीर असून संत्रा उत्पादक शेतकऱ्यांवर अन्याय करणारी आहे.



आधीच निसर्गाची अवकृपा व शासनाचे दुर्लक्ष यामुळे संत्रा उत्पादक शेतकरी डबघाईला आला आहे. यावर काही उपाययोजना करण्या ऐवजी किंवा संत्र्याला राजाश्रय देण्या ऐवजी संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना संपविण्याचा घाटच शासनाकडून व विमा कंपनीकडून होतांना दिसत असल्याचे पुन्हा एकदा पुढे आले आहे.

५ महिन्यांचा कालावधी पूर्ण होऊन सुद्धा अमरावती जिल्ह्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या हक्काचे फळ पीक विम्याचे कोट्यावधी रुपये शासन व रिलायन्स इन्शुरन्स कंपनी वाटप करण्यास दिरंगाई करत असल्यामुळे शासनाची फळ पीक विमा योजना ही संत्रा उत्पादक शेतकर्यांच्या फायद्याची नसून विमा कंपनीच्या फायद्याची असल्याचे निदर्शनास येत आहे.

वरूड तालुक्यातील राजुरा बाजार, पुसला, वाठोडा, वरूड महसूल मंडळातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना मंजूर असलेल्या विम्याची मदत २६ जानेवारी पर्यंत संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यात व्याजासह जमा न झाल्यास, संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना मदतीपासून वंचित ठेवणाऱ्या रिलायन्स इन्शुरन्स विमा कंपनीवर गुन्हे दाखल न केल्यास २७ जानेवारी रोजी हजारो संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना सोबत घेऊन तीव्र स्वरूपाचे चक्काजाम आंदोलनाचा इशारा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, धनंजय मुंडे कृषी मंत्री महाराष्ट्र राज्य. पालकमंत्री चंद्रकांत पाटील, खासदार अनील बोंडे, राज्यसभा खासदार रामदास तडस, आमदार देवेंद्र भुयार, कृषी आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, विभागीय आयुक्त, विभागीय कृषी सहसंचालक अमरावती विभाग अमरावती. जिल्हाधिकारी अमरावती. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अमरावती, प्रमोद पाटील राज्य व्यवस्थापक, रिलायन्स जनरल इन्शुरन्स कंपनी यांना देण्यात आला

यावेळी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रवीण राऊत, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष रुपेश वाळके, सौरभ मानकर, अनुप नागमोते, प्रणव कडू, देवेंद्र गोरडे, नितेश भोयर, दिनेश वानखडे, आशिष निकम, नीलेश कोहळे, अमोल बोडखे, सागर मानकर, ललित खोडे, प्रल्हाद म्हस्के, नरेंद्र नासरे, योगेंद्र भोयर, दामोदर शेंडे, दिवाकर घाटोळे, भागवत बहुरूपी, किसना म्हस्के, दीपक कडू, राजेश साबळे यांच्यासह आदी शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अकोट रोड दर्यापूर वरील बंधन बँक येथे मध्यरात्री चोरी

## २८ हजार ४४० रोख रक्कम चोरट्याने चोरली

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक**
**दर्यापूर –** देशमुख कॉम्प्लेक्स अकोट रोड दर्यापूर येथे दुसऱ्या माळ्यावर असलेले नव्याने सुरू झालेली बंधन बँक येथे काल मंगळवारी दिनांक १६ जानेवारी २०२४ च्या मध्यरात्री दोन अज्ञात वय ३० ते ३५ वर्ष असलेल्या चोरट्यांनी बँकेच्या मुख्य लोखंडी शटर चे कुलूप कापून बँकेत घुसले व बँकेच्या ड्रॉवरमध्ये असलेले २८ हजार ४४० रुपये चोरून निल्याची घटना घडली आहे, बँक व्यवस्थापक गणेश चंद्रभान गवळी राहणार वरझडी तालुका गंगापूर जिल्हा संभाजीनगर यांनी पोलीस स्टेशन दर्यापूर येथे अज्ञात चोरट्याविरुद्ध तक्रार दिली आहे दर्यापूर पोलिसांनी कलम ४५७, ३८०, ३४ नुसार गुन्हा नोंदवून सीसीटीव्हीचे आधारावर चोरट्यांचा तपास सुरू केला आहे, जर नागरिकांना अज्ञात चोरट्यांविरुद्ध कोणतीही माहिती मिळाल्यास, वो गावात संशयित व्यक्ती सापडल्यास




त्वरित पोलीस स्टेशन दर्यापूर येथे माहिती द्यावी असे आवाहन ठाणेदार संतोष ताले यांनी केले आहे दर्यापूर मध्ये वाढत्या चोऱ्या मुळे नागरिक परेशान झाले आहे.

# न्यू हायस्कूल मेन शाळेच्या माजी विद्यार्थ्यांची २१ जानेवारी रोजी एक दिवसीय शाळा उपक्रमाचे आयोजन

## एकदिवसीय शाळेत १९५० ते २०२३ सालापर्यंतचे विद्यार्थी सहभागी होणार.....

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक**
**अमरावती –** अमरावती शहरातील नामांकित न्यू हायस्कूल मेन शाळेच्या शताब्दी समारोह निमित्त माजी विद्यार्थ्यांसाठी एक दिवसाची शाळा हा उपक्रम राबविण्यात येणार असून दिनांक २१ जानेवारी रोजी विभिन्न क्षेत्रातील कार्यरत माजी विद्यार्थी या एक दिवसीय शाळेत उपस्थित राहणार आहेत. या एक दिवसीय शाळेमध्ये १९५० ते २०२३ सालापर्यंतचे विद्यार्थी सहभागी होणार असून नुकतीच त्यासंदर्भात दिनांक ७ जानेवारी रोजी न्यू हायस्कूल मेन शाळेत सभा घेण्यात आली. या सभेत १०० पेक्षा जास्त माजी विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून सभेचे नियोजन करण्यात सहभाग नोंदविला. दिनांक २१ जानेवारी रोजी होणाऱ्या एक दिवसीय शाळेत आजी आणि माजी शिक्षक



विद्यार्थ्यांची तासिका घेणार असून शाळेची सुरुवात सकाळी ११.३० वाजता प्रार्थना व राष्ट्रगीताने होणार असून मधल्या सुट्टीत माजी विद्यार्थी घरून आणलेला डब्ब्याचा तसेच शाळेत तयार करण्यात येणाऱ्या खिचडीचा आस्वाद आपल्या बालमित्रांसोबत घेणार आहेत. एकूण ५ तासिका होणार असून विद्यार्थ्यांनी पांढरा शर्ट घालून शाळेत येणार आहेत तसेच अंतिम तासिका खेळाची होणार आहे. या एक दिवसाच्या शाळेमुळे माजी विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा त्यांच्या बालपणीच्या विश्वात जगण्याची संधी मिळणार असून जुन्या काळातील आठवणीना उजाळा मिळणार आहे त्यामुळे शाळेच्या जास्तीत जास्त माजी विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन नूतन विदर्भ शिक्षण मंडळ या संस्थेचे सन्माननीय सचिव -निनाद सोमण व शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. वर्षा जदबंसी यांनी केले आहे.

पाहिजेत

विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक

अल्पावधीतच हजारो वाचकांच्या पसंतीस पडलेल्या सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक साठी जिल्ह्यातील प्रत्येक तालुका,गाव तसेच वॉर्डनिहाय पत्रकारांची गरज आहे.लिखाणाची आवड तसेच उत्कृष्ट जनसंपर्क असणाऱ्या व्यक्तींनीच आमच्या मेल आय डी वर आजच संपर्क करा

संपर्क- prajasattaknews24gmail.com

# अप्रतिम कलाकृती... २ कोटींहून जास्त व्ह्यूज; 'पारले जी' बिस्किटाचं राम मंदिर

## अयोध्या नगरी राम भक्तीमय झाली असून सोशल मीडियावरही राम मंदिराचा फीव्हर

**दि.१८ विदर्भ प्रजासत्ताक अयोध्या**

अयोध्येतील राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळा अवघ्या २-३ दिवसांवर येऊन ठेपला आहे. त्या पार्श्वभूमीवर देशभरात उत्साह असून पंतप्रधान नरेंद्र मोदींनी २२ जानेवारी रोजी देशात दिवाळी साजरी करण्याचं आवाहन देशवीसीयांना केलं आहे. जगभरातील भारतीय नागरिक या सोहळ्यात स्वत:ला सहभागी करुन घेत आहेत. तर, मार्केटमध्येही राम मंदिर प्रतिकृती, ध्वज, विविध साहित्य व वस्तूंची मोठ्या प्रमाणात विक्री होताना दिसत आहे. डोंबवलीतील रामभक्तांनी चक्क पुस्तकांचा वापर करुन राम मंदिर प्रतिकृती उभारली आहे. तर, आता पारले बिस्किटांचा वापर करुन राम मंदिरांची प्रतिकृती निर्माण केल्याचं दिसत आहे.




अयोध्या नगरी राम भक्तीमय झाली असून सोशल मीडियावरही राम मंदिराचा फीव्हर दिसून येत आहे. राम मंदिर व संबंधित व्हिडिओ, गाणी, पोट्रेट आणि विविध कलाकृतींच्या माध्यमातून राम मंदिर व प्रभू श्रीराम यांचे दर्शन घडत आहे. सोशल मीडियावर एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे. त्यामध्ये, चक्क पारले जी बिस्कीटचा वापर करुन अयोध्येतील राम मंदिराची प्रतिकृती बनवल्याचं दिसून येत आहे. पश्चिम बंगालमधील युवकाने ही कलाकृती बनवली आहे. युवकाने २० किलो पारले जी बिस्किटांचा उपयोग करुन राम मंदिर प्रतिकृती निर्माण केली आहे. विशेष म्हणजे मंदिराची हुबेहुब प्रतिकृती या बिस्कीटांमधून दिसत आहे. त्यामुळे, सोशल मीडियावर या कलाकृतीचं व बनवणाऱ्या युवकांचही जोरदार कौतुक केलं जातंय.

सोशल मीडियावरील durgapurštimes नावाच्या इंस्टाग्राम अकाऊंटवरुन हा व्हिडिओ शेअर करण्यात आला आहे. २२. ५ मिलियन्स नेटीझन्सने हा व्हिडिओ पाहिला असून २६ लाखांपेक्षा अधिक लाईक्स आहेत. तसेच, कॅप्शनमध्ये लिहिले आहे की, २० किलो पारले जी बिस्कीटांचा वापर करुन ही कलाकृती बनविण्यात आली आहे. अनेकांनी या व्हिडिओनंतर कलाकाराचं कौतुक केलंय. त्यासोबतच, अशाप्रकारे अन्न वाया घालवू नये, असा सल्लाही युवकाला देण्यात आला आहे.

# संप मिटला तरी रेशनदुकानातून धान्य मिळेना

## पॉस मशीनमध्ये तांत्रिक अडचण साठा उपलब्ध असूनही धान्य वाटप नाही

**दि१८विदर्भ प्रजासत्ताक चांदूरबाजार**

राज्यातील स्वस्त धान्य दुकानदारांनी १ जानेवारीपासून त्यांच्या विविध मागण्यांसाठी उभारलेला संप संपून दोन आठवड्याचा कालावधी झाला आहे. अद्यापही या पॉस मशीनवर जानेवारी महिन्याचे धान्य उपलब्ध न झाल्याने सर्व कंट्रोल चुकाने कुलूपबंद अवस्थेत असल्याचे दिसून येत आहे.

तालुक्यातील सर्व रेशन दुकानांमध्ये गहू व तांदळाचा साठा उपलब्ध करून देण्यात आला आहे, परंतु तांत्रिक कारणामुळे पॉस मशीनवर साठा २० जानेवारीपर्यंत उपलब्ध होऊ शकत नसल्याने कंट्रोल दुकानदारांना कंट्रोलमध्ये धान्यसाठा असूनसुद्धा तो वितरित करता येऊ शकत नसल्याने कार्डधारकांच्या रोषाला तोंड देण्याची वेळ रेशन दुकानदारांवर आली आहे. अंत्योदय धारकांना साखरमिळालीच नाही,



अनेक दिवसांपासून अंत्योदय कार्डधारकांना महिन्याला मिळणारी एक किलो साखर मिळाली नसून ती केव्हा मिळणार, असाही प्रश्न कार्डधारक रेशन दुकानदारांना विचारत आहे. सध्यस्थितीत असलेल्या पॉस मशीनऐवजी शासन पुढील महिन्यापासून सर्व रेशन दुकानदारांना अद्ययावत पॉस मशिनी - देणार आहे. त्या मशीनवर धान्यसाठा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याने - वितरणास विलंब होत असल्याचे संबंधित - अधिकाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे.शकत नसल्याने कार्डधारकांच्या रोषाला तोंड वेळ रेशन दुकानदारांवर आली आहे. अंत्योदय धारकांना साखर मिळालीच नाही, अनेक दिवसांपासून अंत्योदय कार्डधारकांना महिन्याला मिळणारी एक किलो साखर मिळाली नसून ती केव्हा मिळणार, असाही प्रश्न कार्डधारक रेशन दुकानदारांना विचारत आहे. सध्यस्थितीत असलेल्या पॉस मशीनऐवजी शासन पुढील महिन्यापासून सर्व रेशन दुकानदारांना अद्ययावत पॉस मशिनी देणार आहे. त्या मशीनवर धान्यसाठा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याने वितरणास विलंब होत असल्याचे संबंधित अधिकाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे.

# तंत्रशिक्षण म्हणजे रोजगार व स्वयरोजगाराच्या संधी

## स्कूल कनेक्ट कार्यक्रम कार्यक्रमात डॉ. विजय मानकर यांचे प्रतिपादन

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

स्कुल कनेक्ट २०२४-२५ अंतर्गत जिल्ह्यातील आय.टी.आय.,माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक यांची सभा अभियंता भवन शेगाव नाका अमरावती येथे पार पडली, या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून डॉ. विजय मानकर प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन तथा सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय अमरावती तर प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती निलिमा टाके,सचिव, माध्यमिक परीक्षा बोर्ड,अमरावती विभाग, तेजराव काळे, सहसचिव माध्यमिक बोर्ड अमरावती, निखिल मानकर, उपशिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती, डॉ. गणेश बारब्दे, अध्यक्ष,इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअर्स, स्थानिक केंद्र अमरावती, श्रीमती कांचन मानकर, उपसचिव महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परिक्षा मंडळ,विभागीय कार्यालय, नागपूर आदी मान्यवर व्यासपीठावर कार्यक्रमाला उपस्थित होते. अभियांत्रिकी शिक्षणानंतर विविध क्षेत्रात तरुणांना मिळणारे रोजगार तथा शिक्षणापश्चात स्वयंरोजगार याच्या संधी कशा प्राप्त होऊ शकतात तसेच आर्टिफिशियल इंटेलिजन्स, माहिती व तंत्र ज्ञानाचे या युगात आधुनिक तंत्रशिक्षणाची प्रत्येकाला कशी आवश्यकता भासते व या शिक्षणाला प्रवेश मिळविण्यासाठी उपलब्ध अभ्यासक्रम व कागदपत्राची पूर्तता पूर्वतयारी कशी करावी याबाबत सविस्तर मार्गदर्शन कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.विजय मानकर, सहसंचालक तंत्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती तसेच मंचकावर उपस्थित प्रमुख पाहुणे श्रीमती टाके, श्री काळे, श्री बारब्दे श्रीमती मानकर यांनी या शासकीय कार्यक्रमांतर्गत यावेळी उपस्थित माध्यमिक व उच्च माध्यमिक संस्था समन्वयक, जिल्हयातील आयटीआयचे प्राचार्य तसेच उपस्थितांना केले.यावेळी कार्यक्रमाचे प्रास्तविक प्रा. हमीद शेख,जिल्हा नोडल अधिकारी तथा समन्वयक स्कूल कनेक्ट,अमरावती, संस्थेच्या माहितीचे सादरीकरण डॉ. प्रवीण करडे विभाग प्रमुख माहिती व तंत्रज्ञान, संचालन श्रीमती रंजना वानखेडे, तर आभाप्रदर्शन डॉ. गजनान सराटे, विभाग प्रमुख अनुविद्युत, यांनी केले.

# ऑक्टोबर-२०२५ पर्यंत पूर्ण होईल दीक्षाभूमी विकास प्रकल्प

## नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणचे हायकोर्टात प्रतिज्ञापत्र

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

आंतरराष्ट्रीय श्रद्धास्थळ असलेल्या दीक्षाभूमीच्या सर्वांगीन विकासाचा प्रकल्प १९ ऑक्टोबर २०२५ पर्यंत पूर्ण केला जाईल. नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणने बुधवारी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात प्रतिज्ञापत्र दाखल करून ही माहिती दिली. प्राधिकरण या प्रकल्पाची नोडल एजन्सी आहे.



प्रतिज्ञापत्रातील इतर माहितीनुसार, राज्य सरकारने ३१ मार्च २०२३ रोजी २०० कोटी ३१ लाख रुपयाच्या दीक्षाभूमी विकास प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता दिली आहे. त्यांतर्गत २० ऑक्टोबर २०२३ रोजी हरयाणामधील गुडगाव येथील वायएफसी-बीबीजी या संयुक्त उपक्रम कंपनीला पहिल्या टप्प्यात १३० कोटी ८१ लाख ८१ हजार ९६७ रुपयाच्या कामांचा कार्यादेश जारी करण्यात आला आहे. विकास प्रकल्पामध्ये दीक्षाभूमीच्या चार प्रवेशद्वारांचे विस्तारीकरण, चार तोरणद्वारे नव्याने बांधणे, संग्रहालय, खुले रंगमंच, बेसमेंट पार्किंग, सीमा भिंत, क्लॉक रुम, वॉच टॉवर, शौचालये, पिण्याचे पाणी, कार्यक्रम व्यासपीठ, जलसाठा टाकी, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, अर्थ केंद्र, सुरक्षा केंद्र, सीसीटीव्ही कॅमेरे, हायमास्ट लाईट्स, अग्नीशमन, वातानुकुलन व्यवस्था इत्यादी कामांचा समावेश आहे. प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी महानगर प्राधिकरण आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी, सहआयुक्त अविनाश कातडे, अधीक्षक अभियंता संजय चिमुरकर, सहायक अभियंता पंकज पाटील, सहायक अभियंता नेताजी बांबल व स्थापत्य अभियंता सहायक अभय वासनिक यांची समिति स्थापन करण्यात आली आहे.

### सुनावणी दोन आठवडे तहकूब

दीक्षाभूमीच्या सर्वांगीन विकासाकरिता ड. शैलेश नारनवरे यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. त्यावर न्यायमूर्तिद्वय नितीन सांबरे व अभय मंत्री यांच्यासमक्ष सुनावणी झाली. दरम्यान, ड. नारनवरे यांनी प्राधिकरणच्या प्रतिज्ञापत्राची प्रत स्वीकारून त्यावर भूमिका मांडण्यासाठी वेळ देण्याची विनंती केली. त्यामुळे न्यायालयाने प्रकरणावरील सुनावणी दोन आठवडे तहकूब केली. प्राधिकरणच्या वतीने ड. गिरीश कुंटे यांनी कामकाज पाहिले.

### यामुळे दीक्षाभूमीचा विकास आवश्यक

दीक्षाभूमी येथे दरवर्षी धम्मचक्र प्रवर्तन दिवस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, महापरिनिर्वाण दिवस यासह विविध कार्यक्रम होतात. त्यासाठी देश-विदेशातून मोठ्या संख्येत अनुयायी येतात. परंतु, या ठिकाणी निवास, भोजन, स्वच्छतागृह, परिवहन इत्यादी आवश्यक सुविधा नसल्यामुळे अनुयायांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. अनेक वर्षांपासून अशीच परिस्थिती आहे. करिता, दीक्षाभूमीचा विकास आवश्यक आहे, असे याचिकेत नमूद करण्यात आले आहे.

# कांदा लागवडीचे क्षेत्र घटले शेतकऱ्यांची पेरणीच्या कांद्याला पसंती



**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक काकडा**

सध्या ग्रामीण भागात कांदा लागवडीच्या हंगामाला सुरवात झाली असून शेतकरी त्यात गुंतला आहे. एकेकाळी काकडा परिसरात कांदा लागवड मोठ्या प्रमाणात केली जायची. उत्पादनसुद्धा चांगले होत होते. मात्र आता खचपिक्षा उत्पादन कमी होत आहे. भावदेखील मिळत नसल्याने शेतकऱ्यांनी कांदा लागवडीकडे पाठ फिरविल्याचे दिसून येते.

कांद्याचे पीक घेण्यासाठी लागवडीपासून ते काढणीपर्यंत शेतकऱ्यांना जवळपास तीन-चार महिने मेहनत करावी लागते. सर्वप्रथम कांद्याचे बी फेकून रोपे तयार करणे व ती लावणीयोग्य झाली की उपटून शेतात लावावी लागतात. सध्याच्या परिस्थितीमध्ये विचार केला तर कांदा लागवड पेरणीक्षेत्र पुढील काही दिवसांनी बंद होणार असल्याचे चित्र आहे. दरवर्षी वाढती मजु लक्षात घेता त्याप्रमाणात खर्च करून देखील कांद्याला पाहिजे त्याप्रमाणात भाव मिळत नसल्याने नाइलाजास्तव कवडीमोल दराने विक्री करावी लागत आहे.कांद्याला सतत पाणी देणे, रासायनिक खते, फवारणी व मजुरीवर मोठा खर्च

करावा लागतो. दरवर्षी कांद्याला कमी दराने विक्री करावी लागत असल्याने खर्चाचा ताळमेळ बसत नाहीं. भाव मिळत नसल्याने हताश होऊन कांदा कमी भावात विकावा लागतो. दिवसाकाठी भारनियमन वाढल्याने केवळ आठवड्यातून चार दिवस रात्री आठ तास व सकाळी आठ तास वीज उपलब्ध असल्याने ओलित करताना कसरत करावी लागत आहे. त्यामुळे सलग दिवसाने वीजपुरवठा करावा, अशी मागणी शेतकऱ्यांची आहे.

# अखेर तीन वर्षानंतर गावकाऱ्यांच्या मागणीला यशत्या दुर्लक्षित पाण्याच्या टाकीच्या कामाला अखेर सुरवात



**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक तळवेल**

चांदुर बाजार तालुक्यातील १०५ गावाला नदीवरील धरणातून पाणीपुरवठा करण्याची योजना मागील कित्येक वर्षांपासून सुरू आहे. परंतु नियोजनाच्या अभावी ग्रामीण भागातील नागरिकांचा मनस्ताप होत होता. प्रशासनाकडून स्वच्छता तसेच आरोग्याची खबरदारी घेन्याचे आदेश वारंवार प्रशासन करीत आहे. परंतु तळवेल येथे प्राधिकरण विभाग यांच्या हस्तांतरित करण्यात आलेली पाण्याची टाकी नादुरुस्त होती कोरोना काळामध्ये सुद्धा कित्येक महिने पाण्याची टाकी न धुता गावामध्ये पाणीपुरवठा करण्यात येत होता गावातील सामाजिक कार्यकर्ते सागर मोहोड यांनी वेळोवेळी पत्रव्यवहार व निवेदन देऊन पाठपुरवठा केला अखेर दोन वर्षांनी पाण्याच्या टाकीचे कामाची अखेर सुरवात झाल्याले ग्रामस्थ्यांनी समाधान व्यक्त करीत आहे

प्राधिकरण विभागाच्या मार्फत तळवेल येथे पाणीपुरवठा सुरळीत चालू आहे. पाणीपुरवठा सुरळीत चालू राहण्याससाठी ग्रामपंचायत अधिकारात असलेली पाण्याची टाकी जीवन प्राधिकरण यांच्या - हस्तांतरित देण्यात आली आहे परंतु पाण्याची टाकी नादुरुस्त असल्याने रोजंदारीवर असलेल्या कर्मचाऱ्यांनी मागील कित्येक महिने टाकी स्वच्छ न करता पाणीपुरवठा कोरोना काळामध्येही सुरु होता कोरोनाच्या काळामध्ये सगळीकडे सतर्कता घेण्यात येत होती परंतु आरोग्याचा मोठा वाटा असलेल्या पाण्याकडे - मात्र दुर्लक्ष केल्या जात होते. टाकीचे वय संपत आल्याचे उत्तरे स्वतः टाकीच देत होती टाकीला अनेक ठिकाणी भेगा पडल्या होत्या टाकीचे पोपडे पडत होते तसेच बांधकाम करत्या वेळी वापरण्यात आलेल्या लोखंडी बार डोळ्याला त्रास न देताच स्पष्टपणे दिसत होते. टाकीवर चढण्या-उतरण्यासाठी बांधण्यात आलेल्या शिळ्या डलडल हालत होत्या त्यावर चढ उतार करणे म्हणजे अपघाताला आमंत्रण दिल्यासारखेच होते पाण्याच्या टाकीच्या बाजूलाच बस थांबा आहे तसेच घरे सुद्धा आहे अजीर्ण झालेली टाकी जर कोसळली तर जिवीतहानी झाल्यास जबाबदारकोण असे अणे प्रश्न घेऊन गावातील नागरिक यांनी गटविकास अधिकारी चांदुर बाजार तहसीलदार चांदुर बाजार तसेच प्राधिकरण विभाग, बांधकाम विभाग अचलपूर, जिल्हाधिकारी अमरावती अश्या अनेक अधिकाऱ्यांची भेट घेऊन परिस्थिती लक्षात आणून देऊन पत्रव्यवहार केला निवेदन दिले उपोषणासाठी अल्टीमेटन सुद्धा दिले अखेर तीन वर्षानंतर केलेल्या प्रयत्नाला यश मिळाले अखेर टाकी बांधकामास सुरवात झाल्यावर गावाकरी व सागर मोहोड यांनी समाधान व्यक्त केले.

अखेर आज तीन वर्षांनी पाण्याच्या टाकीचे बांधकाम सुरु झाल्याने गावकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले सध्या जुन्या पाण्याच्या टाकीवरून पाणीपुरवठा बंद असून नवीन टाकीची क्षमता सुद्धा वाढवन्यात आली आहे तसेच भविष्यातील पाण्याची चिंता मिटेल अशी अपेक्षा असल्याचे व्यक्त केल्या जात आहे.

# रेलरोको, पोलिसांची नोटीस अन् रविकांत तुपकर झाले अचानक भूमिगत

## पोलिसांचा घरासमोर मोठा बंदोबस्त



**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक बुलढाणा**

शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी गेल्या काही महिन्यांपासून सोयाबीन-कापूस प्रश्नावर लढा उभारला आहे. केंद्र व राज्य सरकारला वारंवार वेळ देऊनही ते सोयाबीन कापसाबद्दल बोलायला तयार नसल्याने रविकांत तुपकर यांनी १९ जानेवारीला रेल्वे रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. या आंदोलनाच्या इशाऱ्यानंतर लोहमार्ग पोलिसांनी तुपकरांना नोटीस बजावली आहे. तुपकर हे रात्रीपासूनच भूमिगत झाले आहेत. त्यांच्या घराला पोलिसांनी वेढा घातला आहे.

सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरुन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर आक्रमक झाले आहेत. विदर्भातील नगदी पीक असलेले सोयाबीन आणि कापूस या पिकांना उत्पादन खर्चापेक्षाही कमी भाव मिळत आहे. कापूस-सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी तुपकरांनी आंदोलन उभारले आहे.एल्गार मोर्चा, विधान भवनावर मोर्चा, केंद्रीय मंत्री पीयूष गोयल आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट मात्र अद्यापही यावर तोडगा निघत नसल्याने रविकांत तुपकर यांनी आता रेल्वे रोको आंदोलनाचा इशारा दिला आहे. १९ जानेवारी रोजी मुंबई, गुजरातकडे जाणाऱ्या सर्व रेल्वे गाड्या रोखू असा इशारा दिल्यानंतर बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव लोहमार्ग पोलिसांनी तुपकरांना नोटीस बजावली आहे. दुसरीकडे रात्रीपासून पोलिस तुपकरांचा शोध घेत आहेत.अटक बेकायदेशीर असल्याचे म्हणत न्यायालयाने त्यांची जामिनावर सुटका केली होती. आता पुन्हा रेल्वे रोको आंदोलनाच्या पूर्वी पोलिस 'अलर्ट मोड'वर असून तुपकर यांना पुन्हा अटक होते, का याकडे संपूर्ण राजकीय वर्तुळाचे लक्ष लागून आहे.

लोकसभा निवडणूक लढविणार असल्याची घोषणा तुपकर यांनी काही दिवसांपूर्वी केली. मात्र कापूस-सोयाबिन उत्पादक शेतकऱ्यांसाठीच आंदोलन त्यांनी चालूच ठेवले. इकडे लोकसभा निवडणुकीची तयारी तुपकरांकडून केली जात आहे. तिकडे आंदोलनाच्या माध्यमातून लढा उभारला आहे. राजकारणापेक्षा आंदोलन आणि सामाजिक लढा हाच तुपकरांचा पींड आहे.

पोलिसांनी दिलेल्या नोटीसांची आपल्याला सवय आहे. अशा नोटीसांना आपण भीक घालत नसल्याचे म्हणत आंदोलन होणारच असे तुपकरांनी म्हटले आहे. त्यामुळे रात्रीपासून रविकांत तुपकर हे भूमिगत झाले आहेत. त्यांच्या बुलढाणा येथील घरासमोर पोलिसांचा बंदोबस्त लावण्यात आला आहे. यापूर्वीही तुपकर यांच्या घरासमोर बंदोबस्त लावून तुपकर यांना अटक करण्यात आली होती.

# अमरावतीची जागा काँग्रेसकडेच राहणार! नाना पटोलेंचाही दुजोरा



**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

लोकसभा निवडणुकी काँग्रेसची व्यूहरचना ठरवण्यासाठी गुरुवारी (ता. १८) अमरावती शहरात पश्चिम विदर्भाची पहिली आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीला काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेशाध्यक्ष आमदार नाना पटोले, बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण अमरावतीमध्ये दाखल झाले.

अमरावती, यवतमाळ, वाशीम, बुलढाणा आणि अकोला जिल्ह्यातील काँग्रेसचे नेते आणि महत्वाचे पदाधिकारी बैठकीला उपस्थित झाले. यावेळी बोलताना प्रदेशाध्यक्ष आमदार नाना पटोले यांनी अमरावती लोकसभा मतदारसंघावर काँग्रेसचा दावा असल्याचा दुजोरा दिला.काँग्रेसनेते बाळासाहेब थोरात यांनी अमरावतीच्या जागेवर काँग्रेस दावा करणार असल्याचे सूतोवाच केले. त्याच वक्तव्याची आमदार पटोले यांनी पुष्टी केली. ते म्हणाले, काँग्रेसची स्थिती अमरावती लोकसभा मतदारसंघात चांगलीच मजबूत आहे. त्यामुळे काँग्रेस अमरावतीची जागा आपल्याला मिळावी, यासाठी आग्रही भूमिका मांडणार आहे. लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेस तयारीला लागली आहे. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला मोठे यश प्राप्त होईल, असे पटोले म्हणाले.

राज्यात ४० जागा महाविकास आघाडीला मिळतील. सर्वेक्षणातून तशी बाब पुढे आली आहे. या सर्वेक्षणामुळे आता भाजप घाबरली आहे. त्यामुळेच पंतप्रधान नरेंद्र मोदी महाराष्ट्रामध्ये येत आहेत, असा दावा पटोले यांनी केला. देशात आणि महाराष्ट्रात भाजपला उतरती कळा लागली आहे. त्यामुळे भाजप आता धार्मिक कार्डाचा वापर करीत आहे. येत्या १५ दिवसांत संपूर्ण लोकसभा निवडणुकीच्या जागावाटपाचा निर्णय होईल. त्यानंतर भाजपला आणखी चिंता निर्माण होईल, असेही पटोले म्हणाले. अमरावतीमध्येही काँग्रेसची स्थिती उत्तम नव्हे, तर मजबूत आहे. त्यामुळेच काँग्रेसने अमरावतीच्या जागेसाठी आपली दावेदारी दाखल केली आहे. राज्यात मेरिटच्या आधारावर जागावाटपाचा 'फार्म्युला' ठरणार आहे. जिथे ज्या पक्षाला जास्त जागा मिळू शकतात, तिथे त्या पक्षाला उमेदवारी देण्याबाबतचा विचार केला जाणार आहे, असे पटोले यांनी स्पष्ट केले.

महाविकास आघाडीच्या या फार्म्युल्याच्या माध्यमातून जास्तीत जास्त जागा जिंकण्याचा प्रयत्न आहे. त्यामुळे केंद्रीयस्तरावर काँग्रेस बळकट होईल, असा ठाम विश्वास आमदार नाना पटोले यांनी मेळाव्यापूर्वी बोलताना व्यक्त केला. नागपूर येथे काँग्रेसच्या स्थापनादिन सोहळ्यानंतर राज्यभरातील काँग्रेस कार्यकर्त्यांचे मनोबल उंचावल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले. त्याचा फायदाही काँग्रेसला निश्चितच होणार असल्याचे ते म्हणाले.

# रविवारी बडनेऱ्यात रामलल्ला स्वागतोत्सव झांकी

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक बडनेरा**

अयोध्या येथील श्रीरामजन्मभूमीवर उभारण्यात येत असलेल्या भव्य श्रीराम मंदिरात श्रीरामललाची प्रतिष्ठापना होण्याच्या पूर्वसंध्येला रविवार, २१ जानेवारी २०२४ रोजी बडनेराच्या नव्यावस्तीतील आठवडी बाजारात 'अवध में राम आये है' शिर्षकाखाली श्रीरामलला स्वागतोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.३० ऑक्टोबर १९९० साली झालेल्या कारसेवेत सक्रिय सहभागी रामभक्त शिवराय कुळकर्णी आणि बडनेरा येथील सकल हिंदू समाजाने या भव्य कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमाला माजी पालकमंत्री आ. प्रवीण पोटे पाटील, प्रमुख वक्ते जयंत डेहणकर, प्रा. दिनेशजी सूर्यवंशी, किरण पातूरकर, प्रा. रवींद्र खांडेकर, चेतन पवार, सिद्धार्थ वानखडे प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.याप्रसंगी सचिन गुडे आणि सिम्फनी ऑर्केस्ट्रा मराठी व हिंदीतील प्रसिद्ध, जोषपूर्ण श्रीराम गीतांचे सादरीकरण करणार आहेत. झांकी, आतिषबाजी, महाआरती, प्रसाद वितरण असा भरगच्च कार्यक्रम आहे. बडनेरातील सर्व भागातील तरुण कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी झटत आजेत. या कार्यक्रमाला उपस्थित राहावे, अशी विनंती बडनेराच्या सकल हिंदू समाजाने केली आहे.

# 'इंडिया' मजबूत होत असल्यानेच भाजपकडून संभ्रम निर्माण केला जातोय

## 'वंचित'चे प्रकाश आंबेडकरांना सोबत घेतले गेले पाहिजे

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

: 'इंडिया' आघाडी दररोज मजबूत होत आहे. त्यामुळे भाजपकडून संभ्रम निर्माण केला जात आहे. वेगवेगळ्या खेळी त्यांच्याकडून खेळल्या जात आहे. भाजपच्या या खेळीला फार महत्त्व नाही, असे ठाम मत काँग्रेसचे नेते तथा माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी व्यक्त केले.

काँग्रेसच्या विभागीय मेळाव्याच्या निमित्ताने अमरावती येथे आले असता त्यांनी गुरुवारी (ता. १८) प्रसार माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, देशात सर्वत्र सध्या संभ्रम निर्माण करण्याच्या गोष्टी सुरू आहेत. जसजशी निवडणूक जवळ येईल, तशा अनेक गोष्टी वाढणार आहेत. वंचित बहुजन अघाडीचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांना सोबत घेतले पाहिजे अशी भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.महाविकास आघाडीमध्ये प्रकाश आंबेडकर यांनी यावे असे आवाहन त्यांनी केले. राष्ट्रीय पातळीवर त्यांना 'इंडिया' आघाडीत घेण्यासाठी प्रयत्न करणार आहोत, असेही अशोक चव्हाण यांनी नमूद केले. महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादावर बोलताना ते म्हणाले की, राज्य सरकारने आधी आपल्या सीमा पाहिल्या पाहिजे. आपल्या सीमावर्ती भागात लक्ष दिले पाहिजे तेथे सोयीसुविधा पोहोचविल्या गेल्या पाहिजे. कर्नाटकने केलेले वक्तव्य चुकीचे नाही, असे त्यांनी सांगितले.



लोकसभा निवडणूक जवळ आली आहे. याबाबत बोलाताच चव्हाण यांनी स्पष्ट केले की, अमरावतीच्या विद्यमान खासदार नवनीत राणा काँग्रेससोबत निवडून आल्या आहेत. त्यानंतर त्यांनी भाजपमध्ये उडी मारली. त्यांनी काँग्रेसला विचारत घेतले पाहिजे. गेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने त्यांनी बरीच मोठी मदत केली आहे, याचे स्मरणही त्यांनी राणा यांना करून दिले. भाजपसोबत गेल्यावर नवनीत राणा आणि रवी राणांची काय अवस्था झाली आहे, हे लोकांना माहिती आहे, असा टोलाही त्यांनी लगावला.महाविकास आघाडीमधील अन्य पक्षांवर आपण काहीही बोलणार नाही. काँग्रेस पक्षाची भूमिका महाविकास आघाडीबाबत स्पष्ट आहे. काँग्रेस या भूमिकेबाबत ठाम असल्याचेही चव्हाण म्हणाले. श्रीरामाची पूजा आम्ही दररोज करतो. श्रीराम हे फक्त भाजपची मक्तेदारी नाही. राम मंदिराच्या मुद्द्यावर भाजप केवळ राजकारण करीत आहे. मंदिरात जाण्यासाठी सर्वच दिवस शुभ असतात. असा कोणताही एखादा मुहूर्त शुभ आणि बाकी दिवस अशुभ असे दर्शन घेण्याबाबतीत नसते, असे चव्हाण यांनी सांगितले. आगामी निवडणुकीत भाजपने कितीही प्रयत्न केला तरी काँग्रेस देशातील सर्वांत मोठा पक्ष म्हणून उदयास येईल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# संत काशिनाथ महाराज पुण्यतिथीनिमित्य भागवत सप्ताहाला भाविकांची अलोट गर्दी

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक नांदगाव पेठ**

संत काशिनाथ महाराज यांच्या १८ व्या पुण्यतिथी महोत्सवाला १५ जानेवारी पासून थाटात प्रारंभ झाला.संत काशिनाथ धाम याठिकाणी सुरू असलेल्या भागवत सप्ताहाला दररोज भाविकांची अलोट गर्दी होत आहे.नांदगाव पेठ ते काशिनाथ धाम पर्यंत भाविकांना ने आण करण्यासाठी संत काशिनाथ महाराज ऑटो युनियनच्या वतीने निःशुल्क सेवा देण्यात येत आहे. दररोज दुपारी १ ते ५ दरम्यान काशीनाथ धाम येथे हभप केशवदादा उकळीकर महाराज यांच्या सुमधुर वाणीतून भागवत कथा सुरू आहे. नांदगाव पेठ सह पंचक्रोशीतील भाविक भक्त भागवत कथा श्रवण करण्यासाठी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहत आहेत. महिलावर्गाची लक्षणीय उपस्थिती असून सर्वत्र उत्साह



आणि आनंदमय वातावरण निर्माण झाले आहे.गावात असलेल्या संत काशिनाथ महाराज यांच्या समाधीमंदिरावर आकर्षक रोषणाई करण्यात आली आहे. मंदिरात दर्शनासाठी भाविकांची रीघ लागली असून भगव्या पताकांनी संपूर्ण गाव सजले आहे. पहिल्यांदा काशिनाथ धाम येथे भागवत सप्ताह पार पडत असून भाविकांचा आनंद द्विगुणित झाला आहे. महिला वर्गाला त्रास होऊ नये म्हणून संत काशिनाथ महाराज ऑटो युनियनच्या वतीने भाविकांसाठी निःशुल्क ऑटो सेवा देखील पुरविण्यात येत आहे.दररोज सकाळ संध्याकाळ संत काशिनाथ महाराज यांची आरती तसेच धार्मिक विधी पार पडत आहे. येत्या २२ जानेवारी ला महाप्रसाद वितरण होणार असून भाविकांनी तसेच गावकऱ्यांनी महाप्रसादाला उपस्थित राहण्याचे आवाहन संत काशीनाथ महाराज संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

# रुक्मिणी पिठाचे पिठाधीश्वर श्री राजेश्वर माऊली सरकार प्रतिकात्मक कुंकू कलश घेऊन अयोध्येकडे रवाना





## जय श्रीराम च्या घोषणेने परिसर दुमदुमला

**दि.१८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

येत्या २२ जानेवारीला अयोध्या येथे प्राणप्रतिष्ठा सोहळा होणार आहे. यानिमित्त अंबानगरीतील सकल हिदू समाजाच्या वतीने अंबानगरी ते अवध या अंतर्गत अमरावतीतून प्रभू श्रीराम चरणी ५०० किलो कुंकू पाठवण्याचा मानस केलेला होता. त्यासाठी राजकमल चौक येथे सकाळी १० वाजता कलशाचे विधिवत पूजन करून कलशाची स्थापना करण्यात आली. यामध्ये अनेक नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत कलशामध्ये कुंकू जमा केले.अंबानगरीची विशेष ओळख असलेले कुंकू हे अयोध्या येथे प्रभू श्रीराम यांच्या चरणी अर्पण करण्यासाठी कौडण्यपूर येथील रुक्मिणी पिठाचे पिठाधीश्वर श्री राजेश्वर माऊली सरकार हे त्यांच्यासोबत प्रतिकात्मक कलश मध्ये कुंकू घेऊन बुधवारी सायंकाळी अयोध्ये कडे रवाना झाले आहे. या कुंकू कलशामध्ये कुंकू जमा करण्यासाठी मंगळवारी सकाळी १० राजकमल चौकामध्ये भव्य कलशाची स्थापना मंत्रोच्चाराने करण्यात आली होती. यावेळी रांगोळी व तोरण पताका लावून कलशाचे विधिवत पूजन करण्यात आले.राजकमल चौकामध्ये मंगळवारपासून तर बुधवार सायंकाळ पर्यंत या कलशाला ठेवण्यात आले होते.

बुधवार १७ जानेवारीला सायंकाळी ५ वाजता राजकमल चौकामध्ये - सकल हिदू समाजाच्यावतीने भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी रुक्मिणी पिठाचे पिठाधिश्वर माऊली - सरकार यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुपूजन व इतर कार्यक्रम करून एका प्रतिकात्मक कलशात कुंकू टाकून प्रभू श्रीराम चरणी अर्पण करण्यासाठी माऊली सरकारच्या स्वाधीन करण्यात आले.

या उपक्रमासाठी हिदू क्रांती सेना, शिव प्रतिष्ठान हिदुस्थान, राष्ट्रिय श्रीराम सेना, हिदुहुंकारसेना, विश्वहिदूपरिषद, उत्तर त भारतीय मोर्चा, अंबा मंडल, राजकमल मित्रमंडळ, गौरक्षण समिति, हिदु जनजागृती सेना, बालाजी हनुमान मंदिर, केसरी धर्मसभा, र्तिथकर फाऊंडेशन, जेएमपी फाऊंडेशन, श्री रुक्मिणी पिठ या सर्व संस्थांचे सन्माननीय पदाधिकारी व सदस्य यांनी परिश्रम घेतले.

